# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | श्री. अचलकुमार टिल्लू |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००१ |
| वर्ष | : | पहिले |
| अंक | : | २ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ४२**

MAHMAR 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक २ / जानेवारी २००१



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पहिले / अंक २ / जानेवारी २००१

**संपादक**
श्री. अचलकुमार टिल्लू
**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक
**सहसंपादक**
सौ. मंजिरी दांडेकर
**सहाय्यक मंडळ**
सौ. भारती जोशी
सौ. मनाली देवधर
सौ. विशाखा देशपांडे
कु. दीपाली भाटकर
**कायदेशीर सल्लागार**
ॲड. सलील बुटाला
**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : ५४२ ६२ ७०
**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिन्ट्स,
नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - १.
दूरध्वनी : ५३४ १२ ९१

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. अचलकुमार टिल्लू | ३ |
| २) | माहिती तंत्रज्ञान प्रदर्शन - मा. प्रमोद महाजनांचे भाषण | | ४ |
| ३) | शिवाजीराव भोसले यांच्या अविस्मरणीय भाषणाचा वृत्तांत | | १२ |
| ४) | 'नचिकेत/प्राजक्ता गौरव सोहळा' मा. कुलगुरू श्री. भालचंद्र मुणगेकर यांचे भाषण | | १७ |
| ५) | पहिलीपासून इंग्रजी शिक्षण | निशिता शिरीष कुलकर्णी | २२ |
| ६) | वृद्धाश्रम | कु. अमृता बा. नेने | २५ |
| ७) | शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती कशी निर्माण करावी व जोपासावी | कु. मेधा हेमंत खरे | २७ |
| ८) | परिसर वार्ता | सौ. विशाखा देशपांडे | २८ |

१२ जानेवारी ही विवेकानंदांची जयंती. त्या निमित्ताने या अंकातील सुविचार हे 'विवेकानंदांचे १०१ मौलिक विचार' या पुस्तिकेतून घेतले आहेत. सुविचारांचे संकलन श्री. कौस्तुभ कर्णिक यांनी केले आहे. - संपादक

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी विद्या प्रसारक मंडळ तसेच संपादक सहमत असतीलच असे नाही

मी अशा एका धर्माचा प्रचार करू इच्छितो की ज्याने 'माणसे' तयार होतील.

# विद्वानांच्या विचारधारांनी नवीन सहस्त्रकाचे स्वागत

गेल्या शतकात भारतात विशेषत: महाराष्ट्रात अनेक विचारवंत होऊन गेले. त्यांनी आपल्या प्रगल्भ विचारांनी वेगवेगळ्या क्षेत्रांना समृद्ध केले. त्यात जसे भाषा प्रभु होते, इतिहास संशोधक होते तसेच तंत्रज्ञानी व वैज्ञानिकही होते व या सर्वांच्या वैचारिक कृतींनी निरनिराळे शोध लागले व त्यामुळे आधुनिक जगाचे दर्शन आपल्याला होऊ शकले. अशाच काही विचारवंतांनी विविध सभातून मांडलेले विचार छपाईची सोय नसल्यामुळे वा ते जतन करण्याची आजच्या सारखी साधने नसल्यामुळे झिरपून गेले.

एखाद्या समारंभात व्याख्यानाला बोलावलेली व्यक्ती ही भाषण देण्यासाठी निरनिराळ्या ठिकाणाहून माहिती संकलित करते व आपले व्याख्यान उत्कृष्ट व्हावे याची काळजी घेते. ऐकणाऱ्याला हे विचारधन विनासायास उपलब्ध होते. त्यामुळे अशा व्याख्यानांचे महत्त्व एखाद्या सामान्य श्रोत्याला ज्ञानाच्या दृष्टीने अधिक असते. जुन्या पिढीतील शिवराम महादेव परांजपे, त्याआधीही श्री.कृष्णशास्त्री चिपळूणकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर, न्या. रानडे, श्री. म. माटे, नामदार गोखले, न. चि. केळकर, बाळशास्त्री जांभेकर, अच्युतराव कोल्हटकर, प्र. कृ. खाडिलकर, आगरकर, टिळक, त्यानंतर डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे, विद्याधर गोखले, आचार्य अत्रे, ना. सी. फडके, माधव ज्यूलियन, कै. राम जोशी, पु. वा. बेहेरे वगैरे पट्टीचे वक्ते होऊन गेले. या लोकांची भाषणे ऐकणे ही एक पर्वणीच असे. परंतु त्यावेळी ध्वनिमुद्रणाची सोय नसल्यामुळे पुरी भाषणे फारच थोड्यांची वाचावयास मिळतात. मला वाटते फक्त मराठी साहित्य संमेलनातील अध्यक्षांचे संपूर्ण भाषण हा याला अपवाद असावा.

डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांनी असे लिखित स्वरुपात विचार जतन न केल्याने होणारे नुकसान 'सरस्वतीची हेळसांड' या आपल्या लेखात अतिशय कळकळीने मांडला आहेत. ते लिहितात 'थोर पुरुष विद्यमान असतात तोपर्यंत त्यांची वाणी व कृती यावरून त्यांचे तत्वज्ञान लोकांत पसरत असते. पण त्यांचे विचार, त्यांची शिकवण ग्रंथनिविष्ट झाली नाही तर पुढील पिढीस त्यांचे दर्शन घडत नाही. मराठी राज्यसंस्थापकांची हीच स्थिती झाली. त्यांच्या दिव्य दृष्टीचे, क्रांतिकारक विचारांचे आकलन तत्कालिन पंडित वर्गाला झाले नाही आणि या त्यांच्या प्रज्ञाहीनतेमुळे पुढील पिढ्यांचे अपरिमित नुकसान झाले आहे.'

वरील विचारांनी प्रोत्साहित होऊन आम्ही नवीन सहस्त्रकाचा पहिला अंक हा भाषण विशेषांक म्हणून काढत आहोत व त्यात विद्या प्रसारक मंडळाच्या ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टो. २००० मध्ये संपन्न झालेल्या काही दर्जेदार कार्यक्रमातील प्रमुख वक्त्यांची भाषणे पूर्णपणे देण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यामध्ये माहिती प्रसारण मंत्री श्री. प्रमोद महाजन, प्रसिद्ध इतिहास समिक्षक श्री. य.दि. फडके, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. भालचंद्र मुणगेकर, ओघवती रसाळ वाणी लाभलेले प्राचार्य शिवाजीराव भोसले, या चार वक्त्यांचा समावेश आहे. या अंकाचे प्रयोजन डॉ. सहस्त्रबुद्धे यांच्याच शद्बात मांडावयाचे झाले तर 'राष्ट्रात जे विचार व कर्ते पुरुष निर्माण होतात व त्या पिढीत कर्ती माणसे निर्माण होतात. त्यांचे तत्वज्ञान पुन्हा ग्रंथबद्ध झाले की, ते पुढील पिढीस उपयोगी पडते. आणि अशा रीतीने राष्ट्राचे ज्ञानधन वाढत जाऊन त्यातून अनेक प्रकारची शास्त्रे निर्माण होऊन समाज बलशाली होतो.'

नवीन वर्ष तसेच नवीन सहस्त्रक सर्व वाचनकांस, जाहिरातदारांस व हितचिंतकांस शांतीचे, सुखसमाधानाचे व भरभराटीचे जावो.

संपादक

०००

विद्यमान विज्ञान केवळ बाह्य निसर्गावर मात करण्यात गर्क आहे.

# माहिती तंत्रज्ञान प्रदर्शन - मा. प्रमोद महाजनांचे भाषण

*माहिती तंत्रज्ञान खात्याचे केंद्रीय मंत्री माननीय प्रमोद महाजन आमच्या तंत्रनिकेतनात भरलेल्या प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी येऊन गेले. त्यांचे आत्मविश्वास वाढविणारे भाषण येथे देत आहोत. त्यांची भाषण शैली तशीच ठेवावी असा प्रयत्न, संपादन करताना केला आहे. त्या दृष्टीने काही बोली भाषेतील वाक्ये तशीच ठेवली आहेत. - संपादक*

मी या परिसरात आल्यापासून पत्रकार ते प्राचार्य मला एकच प्रश्न विचारतायत की प्रधानमंत्र्यांची तब्येत कशी आहे? तसा प्रश्न निरर्थक आहे, कारण चांगली नसती तर मी इथं कसा आलो असतो? पण मानवी स्वभावात निरर्थक प्रश्न विचारण्याची सवय आहे आणि म्हणून मला कधी कधी वाटतं की प्रकृती आणि हवामान या दोनच गोष्टी आपण एकमेकांना नेहमीच विचारत असतो, आणि यातल्या एकाही गोष्टीवर आपणा कोणाचच नियंत्रण नसतं. 'कशी काय हवा आहे' असं म्हटल्यानंतर हवा न बदलते, न बदलता येते! पण विचारल्याचं समाधान लाभतं आणि त्यातून आपल्याही मनात प्रश्न असेलच म्हणून मी सुरुवातीलाच त्याचं उत्तर देऊन टाकलं. मला इथं दोन विनंत्या करण्यात आल्या की, 'महाविद्यालय अडचणीत असेल त्यावेळी आपण मदत करा आणि मराठीत बोला'. सगळंच एकूण मला शक्य नसलं तरी काहीच ऐकलं नाही असं होऊ नये म्हणून मी दोघातली एक विनंती मान्य करून मराठीत बोलायचं ठरवलं. खरं तर मी तसंही मराठीच बोलणार होतो. कारण माझा परिचय करून देतांनाच आपल्याला सांगितलंय की, 'यांच मराठी आणि हिंदी या दोन्ही भाषांवर सारखंच प्रभुत्व आहे.' याचा अर्थ ज्या उरलेल्या भाषा आहेत त्यांच्यावर यांच प्रभुत्व नाही. हे आधीच परिचयात आपल्याला सांगितलं असल्यामुळे मला इंग्रजी येत नाही हे वेगळं सांगण्याची गरज आहे असं मला वाटत नाही.

तसंही उल्हासराव इंग्रजीत बोलले असले तरी मराठी माणूस इंग्रजी बोलतो यावर माझा विश्वास नाही. जगातील सर्व माणसं मातृभाषेतच विचार करतात आणि मातृभाषेतच बोलतात. ज्याची भाषांतराची क्षमता जास्त असते तो चांगलं इंग्रजी बोलतो व ज्याची कमी असते तो खराब इंग्रजी बोलतो एवढाच त्याचा अर्थ असतो. कुणी इंग्रजीत विचार करतो यावर माझा बिलकुल विश्वास नाही. आज जरी माहिती तंत्रज्ञानाची भाषा इंग्रजी असली, ती काही काळ राहणार असली, पुढे त्याची मी चर्चा करीन, तरी कधी कधी मला असं वाटतं संस्कृत आणि संस्कृतोत्पन्न ज्या भाषा आहेत, या जगातल्या सर्वात वैज्ञानिक भाषा असल्यामुळे पुढं मागं गणकयंत्रांच्या मूळ भाषा या संस्कृतोत्पन्न भाषा ठरण्याची शक्यता आहे, इंग्रजी नाही. एक साधं उदाहरण देतो, इंग्रजीत आपण म्हणतो 'I drank water' मराठीत म्हणतो 'मी पाणी प्यालो.' आता मराठी भाषेची म्हणजे संस्कृतोत्पन्न भाषेची शक्ती पहा कर्ता, कर्म, क्रियापद कुठेही फिरवले तरी अर्थ बदलत नाही, 'मी पाणी प्यालो, प्यालो मी पाणी, पाणी मी प्यालो.' इंग्रजीत करून पहा. 'I drank water, Water drank I, Drank I water.' आणि म्हणून पुढं English will be the most difficult language. कारण इंग्रजीत उच्चार काय असतात मी जर तुम्हाला आता phonetic order दिली नाही तर तुम्हाला कळणार नाही, मी Knight म्हणतोय का Night म्हणतोय का Nit म्हणतोय. जोपर्यंत मी Reference देणार नाही तोपर्यंत हा माझा नाईट सरदार आहे का रात्र आहे हे तुम्हाला शेवटपर्यंत कळणार नाही. ही त्या भाषेची अडचण आहे. आणि म्हणून माहिती तंत्रज्ञानात भारतीय भाषांचा वापर करणं आज थोडं अवघड वाटत असलं, कारण आपला सराव सुटला असला, तरी ते अवघड आहे असं नाही. आणि इंग्रजीला माझं समर्थन

असलं तरी जे जग जिंकण्यासाठी आहे. आपल्याला हे विसरता कामा नाही की इंग्रजी जाणणाऱ्यांची हिंदुस्थानातली संख्या फक्त ५ कोटी आहे. आणि नुसत्या मराठीची संख्या ९.५ कोटी आहे. आणि म्हणून ज्याला धंदा करायचाय त्याला सुद्धा समजलं पाहिजे की ५ कोटींच्या ग्राहकापेक्षा ९.५ कोटींचे ग्राहक जास्त महत्त्वाचे असतात. हां, सार्वदेशिक विचार करतो त्यावेळी आपल्याला इंग्रजीची आवश्यकता आहे.

तसं आपल्या कॉलेजमध्ये यायची माझी बऱ्याच वर्षांपासूनची इच्छा होती. एकतर मी आता बेडेकरांना विचारलं की आपल्या कॉलेजमध्ये फार वर्षांपूर्वी एक नाडकर्णी सर होते. (मी जिथे शिकलो आणि मी मराठी माध्यमातून शिकलो, इंग्रजी न बोलण्याचं अजून एक कारण आणि मी असं समजतो जे काही लोक इंग्रजी माध्यमातून शिकतात आणि जे मराठी माध्यमातून शिकतात त्यांच्यात एक फरक असतो. इंग्रजी माध्यमातून जे शिकतात ते चुकीचं इंग्रजी धाडधाड बोलतात आणि मराठी माध्यमातून जे शिकतात ते चांगलं इंग्रजी हळूहळू घाबरत बोलतात.) मी शिकत असताना ते माझ्या महाविद्यालयातून आंबेजोगाईहून येथे प्राचार्य म्हणून आले होते. त्यामुळे माझ्या गुरूचं महाविद्यालय पहावं अशी फार दिवसांची इच्छा होती. दुसरं म्हणजे तुमचं महाविद्यालय जाता येता लोकलमधून दिसतं आणि त्यामुळे खाडीच्या काठी महाविद्यालय. मला दोन महाविद्यालये फार रोमँटिक वाटतात; एक विल्सन कॉलेज आणि एक तुमचं कॉलेज. एकाला समुद्र दिसतो आणि दुसऱ्याला खाडी; म्हणजे तुमच्या कॉलेजमध्ये वेळेवर आलो असतो, तर माझा काय उद्देश होता हे तुमच्या एव्हाना लक्षात आलंच असेल. शिक्षण कमी होतं असा त्याचा सरळ अर्थ निघतो. अर्थात मला, नेहमीच खाडीचा वास किती येत असेल असा प्रश्न ट्रेनमधून पडत असे. तुम्हाला त्याचा अनुभव असेल म्हणून मी पुन्हा त्याची चर्चा करत नाही. पण मला इथे येण्याची गरज होती.

खरं म्हणजे मला बोलावलं होतं विद्यार्थ्यांसमोर बोलायला पण ते विचारे इतके दूर बसलेत. बसण्याची पद्धत उलटी असायला हवी होती. विद्यार्थ्यांना पुढे बसवायला पाहिजे होतं आणि जे V.I.P. आहेत त्यांना मागे बसवायला पाहिजे होतं. हे वाक्य मी विद्यार्थ्यांची स्तुती म्हणून म्हणत नाही. भाषणात अडथळे मोठे लोक आणूच शकत नाहीत. त्यामुळे जे आणू शकतील त्यांची आधीच स्तुती केलेली बरी असा स्वार्थ आहे. पण नाही तरी V.I.P. म्हणजे 'Very Important Person' असा असला तरी एकदा देवीलालनं V.I.P. ची व्याख्या 'Very Ignorant Person' अशी केली होती. आणि मी तरुणांना महत्व यासाठी देतो की हे जे माहिती तंत्रज्ञान आहे, त्यात समोर बसलेले हे अडाणी आहेत आणि मागे बसलेले सुशिक्षित आहेत. हे आता देशभर सिद्ध झालेलं आहे. मला आठवतं जेव्हा मी माहिती तंत्रज्ञान मंत्री झालो, (काही पत्रकार त्याला माहिती व तंत्रज्ञान असं म्हणतात. कारण त्यांना माझ्या जुन्या मंत्रालयाची आठवण आहे, माहिती व प्रसारण आणि म्हणून त्यांना वाटतं. माहिती तंत्रज्ञान हे दोन्ही मिळून एक शब्द आहे. Information Technology चं भाषांतर म्हणून. पत्रकारांच्या जास्त चुका मी काढत नाही. नाहीतर उलटसुलट उद्या सकाळी पेपरमध्ये काही छापायचे.) पण सहज माहिती म्हणून सांगावसं वाटतं. त्यावेळी मी आईचे आशिर्वाद घ्यायला गेलो. आता ७० वर्षांची आई, कधीतरी दुसरी निजामाच्या काळात शिकलेली. तिला काय माहिती तंत्रज्ञान कळणार. मी आईला म्हटलं, 'आई, मला अटलजींनी बरं खातं दिलं.' तर आई म्हणे, 'काय बाबा तुझ्या अटलजींच दर वेळी तुझं खातं बदलतो. पहिल्यांदा एकदा संरक्षण दिलं. पुन्हा टेलीव्हीजनचं खातं दिलं. पुन्हा आता हे नवं कोणतं खातं.' मी तिला म्हटलं हे 'Information Technology' तर ती म्हणे, 'पहिलं चांगलं होतं बुवा.' कारण म्हातारपणी नेहमी रिमोट कंट्रोल घेऊन बसलेली असते आणि त्यामुळे जितकी चॅनल टिव्हीवर दिसतात तितकी मुलगाच चालवतो, तो मंत्री असल्यामुळे, अशी तिची समजूत असल्यामुळे तिला वाटलं आता हे

आपल्या घरी दिसणार नाही की काय. म्हटलं तसं नाही, मी नसलो मंत्री तरी. आणि म्हणून म्हटलं तिला सांगावं Information Technology म्हणजे काय, म्हणून मी उल्हासजींसारखं भाषण होतं, जे मी ५-१० ठिकाणी ऐकलं होतं ते सगळं मिळून तिला मराठीत सांगितलं. तिसऱ्या चौथ्या मिनिटाला तिला इतका कंटाळा आला ती म्हणे, 'बाबा बाबा तुला इतकं माहित्येय का. तरीच तुला अटलजींनी या विषयाचा मंत्री केला. त्यांची पारख पण अगदी बरोबर आहे.' खरं म्हणजे तिला कंटाळा आला होता. पण तिला वाटलं काय अद्‌भुत दिसतयं.

हे माझं संभाषण संपता संपता माझी मुलगी तिथे आली. ती सतरा अठरा वर्षांची पोर. तिला इंटरनेट वगैरे जास्ती माहिती. ती म्हणे, 'आजीशी काय बोलत होतात.' आता म्हटलं हिच्यावरही जरा इंप्रेशन पाडावं. मी तिला म्हटलं, 'मी आजीला समजावत होतो I.T. म्हणजे' म्हणून मी तिलाही तेच व्याख्यान दिलं. ५ मिनिटांनी ती म्हणाली, 'अरेरे, बाबा तुम्हाला एवढंच माहिती आहे १०० कोटींच्या देशाचे तुम्ही I.T. Minister तुम्हाला I.T. म्हणजे नीट माहीत नाही, कसं अटलजींनी तुम्हाला मंत्री केलं. नाहीतरी अडाणी लोकांनाच मंत्री करण्याची पद्धत आहे असं दिसतं.' तिनं एक माझ्यावर भाषण दिलं. मी, आजी आणि नात यांच्यामध्ये उभा आहे.

मी एकदा पहाण्याचा प्रयत्न केला Internet चा जास्त वापर कोण करतं, तर ६० % इंटरनेटचा वापर हा ३५ वर्षांच्या आतली मुलं करतात आणि ८९ % वापर ४० वर्षांच्या आतली करतात आणि म्हणून मी गमतीनं म्हटलं की ज्यांना आपण V.I.P. म्हणतो त्यांचा आणि इंटरनेटचा काही संबंध नाही. म्हणजे आपण ज्याला म्हणतो Digital Divided, हे घरात आहे या अत्यंत उच्च शिक्षित माता पित्यांना हे काय लफडं आहे हे कळत नाही. म्हणून ज्यावेळी आपण म्हटलं तरुणांसमोर बोला, त्यावेळी खरं म्हणजे मी उत्साहाने इथे आलो. तुम्ही मागे बसला असलात पुढे बसला असलात तरी माझं भाषण तुमच्यासाठी आहे. आतापर्यंत जर जातांना मध्ये सांडलं तर त्याचा लाभ होईल त्याचा होईल अन्यथा मी तुमच्यासाठी बोलायला आलेलो आहे हे मी मुद्दाम पहिल्यांदा सांगतो.

खरं म्हणजे आपण एक अद्‌भुत उद्‌घाटन आज पाहिलं, म्हणजे मंत्र्यांना सगळ्यात महत्त्वाची शक्ती दिली होती हातात कात्री धरण्याची. काही दिसलं की कापा. एक मंत्री इतका कात्रीनं कापायचा की लोकांनी त्याला लग्नाला बोलावणं सोडून दिलं आणि आता आमच्या हातातली कात्री सुद्धा माहिती तंत्रज्ञानाने घेऊन टाकली. बटण दाबलं की तिकडे कात्री वर गेली, असं झालं. खरं म्हणजे हे माहिती तंत्रज्ञानाने केलेलं माझं दुसरं उद्‌घाटन आहे. पहिले केले मी परवा परळी वैजनाथला गोपीनाथ मुंडेंच्या कारखान्यात. त्यावेळी मोळी टाकण्याचा समारंभ होता. साखर कारखान्यात पहिली मोळी टाकून मग कारखाना सुरू होतो त्याचा समारंभ असतो आणि तिथे सुद्धा त्यांनी I.T. चा इतका वापर केलेला आहे. तिथे त्यांनी मला दीप प्रज्वलित करायला सांगितलं आणि असाच मोठा स्क्रिन होता आणि दुसऱ्या ठिकाणी समईचं चित्र होतं. तर ते म्हणाले, 'आता माऊसनी ही ज्योत या कोपऱ्यातून वर उचला आणि हळूहळू नेऊन त्याच्यावर लावा', नंतर मला कळलं की वैज्ञानिक उद्‌घाटन करणं हा यांचा उद्देश नसून, बाला माऊस वापरता येतो की नाही, हा आपल्याला मंत्री म्हणवतोय, हे माझ्या नंतर लक्षात आलं. म्हणून ते पहिलं अद्‌भुत उद्‌घाटन होतं हे दुसरं आहे.

मला आज माहिती तंत्रज्ञान फार कळतं म्हणून मी उद्‌घाटनाला आलोय असं नाही आणि संयोजकांनी ढोंग सांगितलं हा मंत्री आहे म्हणून याला उद्‌घाटनाला बोलावले. कारण मंत्र्याला सर्व उद्‌घाटन करण्याचा अधिकार असतो. कोणत्याही पत्रिकेवर पहा, लिहिलेलं असतं 'यांच्या शुभ हस्ते'. मंत्र्यांचे हात 'शुभ' असतात यावर १ % लोकांचा विश्वास नसतो तरी १०० % पत्रिकेवर लिहिलेलं असतं आणि मंत्री कशाचाही उद्‌घाटन करू शकतो. सकाळी कुटुंब नियोजनाच्या कार्यक्रमाचे उद्‌घाटन करतो, दुपारी

प्रसूतिगृहाची इमारत सुरू करतो. संध्याकाळी दारूबंदीवर व्याख्यान देतो, रात्री बिअरबारची फित कापतो. एकाच दिवसात इतके अद्भुत पराक्रम तो करतो. त्यात अजून एक Millenium I.T. त्यात फार काही फरक पडतो असं नाही.

**पण गेल्या ५ वर्षात माहिती तंत्रज्ञानाने जी प्रगती केली ती अद्भुत आहे.** कल्पनेच्या पलीकडे आहे. आता तुम्ही WAP टक्नॉलॉजीने म्हणजे वायर न वापरता उद्घाटनाचा प्रयोग शिकवला. आठवत असेल ५ वर्षांपूर्वी तुम्ही माझी व्यंगचित्रे पाहिली असती तर, माझ्या दोन्ही कानांना मोबाईल फोन लावलेला आहे अशी व्यंगचित्र लोकांनी छापली. इतकंच काय अनेकांनी, 'भाजपासारख्या सोज्वळ पक्षामध्ये हा मोबाईल कल्चरसारखी घाणेरडी संस्कृती आणतो आहे' असे आरोप करणारे आणि ऐकणारे त्यांच्याच प्रत्येकाच्या हातात एक मोबाईल टेलिफोन आहे आणि इतका मोबाईल टेलिफोन झालाय की प्रत्येक थिएटरच्या बाहेर लिहावं लागते. लहान मुलं आणि मोबाईल दोघांनाही बंदी आहे. कारण हे दोघंही कधी रडायला सुरुवात करतील याचा भरवसा नसतो. केवढी प्रगती झाली गेल्या ५ वर्षात. मी अंदाज धरतोय पुढच्या २ किंवा ३ वर्षानंतर हिंदुस्थानात काय, जगाच्या कुठच्याही कोपऱ्यात तुम्ही गेलात फक्त एकच टेलिफोन नंबर असेल. हा चमत्कार गेल्या ५ वर्षांतला आहे. आता याचे फायदे आणि तोटे ही आहेत. याचा सगळ्यात मोठा तोटा म्हणजे आता मंत्री बाथरूममध्ये राहू शकत नाही. लोक म्हणतील, मोबाईल दे ना. आणि फायदा म्हणजे तुम्हाला सांगायच असेल की मी कामात आहे, ते मी पुष्कळदा करतो, हॉटेलमध्ये बायकापोरांबरोबर जेवायला बसलो असलो आणि कुणाचा फोन आला तर मी म्हणतो, 'अटलजी समोर बसलेत. जरा अर्ध्या तासाने फोन कर!' तिथं अटलजी असतात का नसतात त्याला चेन्नईवरून कळत नाही. गावात अटलजी असले म्हणजे झालं. नंतर मी एक लेख लिहिणार आहे मोबाईलचे फायदे तोटे यावर.

मी तीन वर्षांपूर्वी चीनमध्ये गेलो आणि एका फ्रेंच टेलीकॉमची जाहिरात पाहिली आणि मला लक्षात आलं की या मोबाईलने किती क्रांती केली. मला ती आठवते जाहिरात. सायंकाळची वेळ, द. फ्रान्समध्ये समुद्र किनाऱ्यावर एकजण असाच वाळूवर चालतोय. दुसऱ्या शॉटमध्ये चीनची जगप्रसिद्ध भिंत दाखवली. तिथे एक म्हातारा माणूस पहाटेच्या अंधारात फेऱ्या मारतोय. एक दोनदा असा शॉट झाल्यानंतर त्या द. फ्रान्सच्या समुद्रात सूर्य बुडतांनाचे दृश्य दाखविले. तो फ्रेंच माणूस त्याने खिशातून फोन काढून नुसतं बटन दाबलं आणि लगेच दुसरा शॉट चीनच्या भिंतीवर दाखविलेला तो म्हातारा माणूस चालता चालता त्याच्या खिशात घंटी वाजली. त्याने खिशातून फोन काढला नि आपल्या कानाला लावला आणि लगेच त्या दूरदर्शनवर दोन्ही माणसं एकदम दाखविली. एका बाजूला सूर्य समुद्रात बुडत होता आणि त्या फ्रेंच माणसाने त्या चीनी माणसाला विचारले, Has he come? तो आला का? आणि त्या चीनी माणसाने पूर्वेकडे पाहिलं तिथे अर्धा सूर्य बुडालेला होता आणि इथे अर्धा सूर्य निघत होता. उगवत्या सूर्याला पाहून म्हटलं, Yes, he has come. म्हणजे आपण इतिहासात वाचलं असेल की इंग्रजांच्या राज्यावर सूर्य मावळत नव्हता. आता तुमच्या माझ्या हालचाली सोडून द्या. सूर्याच्या २४ तासाच्या हालचाली सुद्धा सामान्य माणसं टिपू शकतात एवढी विलक्षण प्रगती या माहिती तंत्रज्ञानानं केली आहे.

म्हणजे आता नव्या काळातलं विमान कसं असेल, तर मला एकानं सांगितलं ते इतकं (माझ्या घरी माझी दोन्ही मुलं पायलट असल्यामुळे विमानाची थोडी थोडी मी माहिती घेतो) तर मला सांगितलं की, कॉकपीट असं येणार आहे की तेथे वैमानिकाला हात लावायची गरजच नाही. इमरजन्सी शिवाय. It will be so computerised आणि म्हणून गमतीनं कोणी तरी लिहिलं अत्याधुनिक विमानातल्या कॉकपीटमध्ये एक वैमानिक असेल आणि एक कुत्रा असेल. मी म्हटलं, अहो वैमानिक बरोबर आहे इमरजन्सीसाठी. पण कुत्रा कशाला पाहिजे? तर म्हणे,

कुत्र्याला ट्रेनींग दिलेलं असेल की इमरजन्सी जोपर्यंत येत नाही तोपर्यंत वैमानिकाने बटणाला हात लावायचा नाही. यावर तो लक्ष देईल. मी म्हटलं, तो कुत्रा त्याच्यावर लक्ष ठेवणार आहे आणि इमरजन्सी बहुधा येत नाही. वैमानिक पाहिजे कशाला? तर म्हणे, ८-९ तासांच्या फ्लाईटमध्ये कुत्र्याला भूक लागली तर त्याला बिस्कीट कोण खाऊ घालेल? हे नवयुग आहे. माहिती तंत्रज्ञान, ज्याने तुमचं आयुष्य कल्पनेच्या पलीकडे या शब्दातसुद्धा ताकत उरलेली नाही. म्हणजे हा शब्द सुद्धा गुळगुळीत वाटतो इतकं बदलून दाखवलं. हे नेमकं माहिती तंत्रज्ञान आहे तरी काय? काही जणांना वाटतं हे काही तरी अद्‌भुत विज्ञान आहे आणि खरच अद्‌भुत आहे.

मी काल अटलजींना आलेल्या एका पत्रकाराचं पत्र वाचत होतो. तो भारताची दोन युद्धे कव्हर केली होती अशा मोठ्या असोसिएट प्रेसचा पत्रकार होता. त्याने पर्सनल लेटर लिहिलं होतं आणि त्यात त्याने लिहिलं होतं की पुढे पुढे माहिती तंत्रज्ञानाची एवढी ताकत येईल की जो आपण पट्टा बांधतो त्याला जो मध्ये छोटा भाग असतो, This belt can carry the information which is carried by the super computer in multination corporation taday. आतातरी आपण हातात फोन वापरतो पुढे गॉगल मध्ये फोन येणार. नुसता गॉगल लावायचा आणि बोलायचं. तुम्ही बोलताय काय वेड्यासारखे हे लोकांना कळणार नाही हो. कारण फोनवर बोलताय असं दिसणार नाही ना. आणि म्हणून येणारं युग इतकं अद्‌भुत असेल. यात विज्ञान आहेच यात शंकाच नाही. ज्ञान आहेच आणि हे एकमेकांना वाटलं पाहिजे. म्हणजे ज्ञान वाटल्याने वाढत असं सगळेच सुभाषितात मानतात. पण परीक्षा केंद्रात मात्र दोन विद्यार्थी एकमेकांच्या ज्ञानाचं शेअरिंग करू लागले तर त्यातल्या एकाला बाहेर का हकलून देतात हे विद्यार्थ्यांना आजपर्यंत कळलेलं नाही. आता बोलतांना सांगितलं, विद्यादानासारखं दान नाही. आता मी माझ्या मागे बसलेल्या मुलाला जर हे श्रेष्ठ दान करत आहे तर गुरूजी मला का म्हणतात की हे दान तू करू नकोस, हे मला कळत नाही. खरं म्हणजे मला इतका कोणी अधिकार देणार नाही आणि दिला तरी एका रात्रीत ते बदलता येणार नाही. पण मला जर कोणी परीक्षा घ्यायला सांगितली तर मी इतका कठीण पेपर काढेन, पण तुम्हाला कोणालाही विचारायची परवानगी असेल. लायब्ररीत जायची परवानगी आहे, घरी जा, काही करा. मी तुम्हाला सांगतो ५ वर्षांनंतर परीक्षा इंटरनेटवर असणार, त्यामुळे त्या मुळात कठीण असणार. हे गृहीत आहे की तुम्ही कॉपी करणार आहात. आम्हाला काही त्यात इंटरेस्ट नाही. कारण दुसऱ्यालाही ते येणार नाही. हे नवं अद्‌भुत जग आहे. **खरं म्हणजे हिंदुस्थानात स्वतंत्रतेच्या आंदोलनानंतर जर दुसरे कोणते आंदोलन झाले असेल तर माहिती तंत्रज्ञानाचे आहे.** परवा माझा हजाम मला म्हणत होता, 'मी IT एनेबल हेअर कटींग सलून काढणार आहे. तुम्ही उद्‌घाटनाला या.' म्हटलं, IT एनेबल सलून म्हणजे काय? तर म्हणे केस कापले की, नीट कापले नाही म्हणून तुम्ही नेहमीच तक्रार करता यावेळी डाव्या बाजूचं चुकलं परवा उजव्या बाजूचं चुकलं. आता मी असं कॉम्प्युटराईज्ड् सलून काढणार आहे की तुम्ही आलात की निरनिराळ्या कटमधले तुमचे फोटो तुम्हाला दाखवणार. तुम्हाला जो आवडेल तोच कट होईल. पुन्हा रागवायचं कारण नाही. हा IT चा सलूनसाठी उपयोग! असं या IT ने सगळं जग व्यापल्यामुळे याचं आकर्षण. यात विज्ञान आहे यापेक्षा IT त पैसा आहे. आता काय सांगितलं उल्हासरावांनी की अमिताभकडे न जाता 'करोडपती' बनायच असेल तर IT निवडा आणि एका रात्रीत करोडपती काय चिल्लर, अब्जाधीश व्हायला माहिती तंत्रज्ञानासारखं क्षेत्र नाही म्हणून लोकांना आकर्षण. आणि म्हणून माहिती तंत्रज्ञानात जग इतकं बदललंय की तुम्हाला तुमचे गुरूजी सांगत असतील की अनुभव हाच गुरू. नाही, अनुभव हा अनावश्यक आहे. किंबहुना माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात काही दिवसांनी अनुभव हे ओझं आहे. म्हणजे ५ वर्षांनी ज्या जाहिराती येतील त्यात लिहिलं जाईल, Only Fresh Candidate needed. Expireance will be treated

totally Disqualification. Expirianced Person need not apply. कारण यात इतकं नव घडणार आहे की अनुभव म्हणजे काय, एकच गोष्ट ती एका पद्धतीनं करणं याला म्हणतात 'अनुभव'. त्यात नवं थोडंच असतं. आणि त्यामुळे अनुभवी माणसं तीच ती गोष्ट पुन्हा करू शकतात. ते नव्याचा शोध लावू शकत नाहीत . Smart person मधले S आणि M माझ्यामते Stupidity & Madness या Stupidity आणि Madness ची आर्ट ज्याला कळली तो खरा. कारण शेवटी शास्त्रज्ञ आणि वेडा माणूस यातली सीमारेषा फारच अंधुक असते. तिथेच शोध लागतात आणि म्हणून यात पैसा आहे, म्हणून लोक येतात. म्हणून आपल्याला हे कळलं पाहिजे शेवटी माहिती तंत्रज्ञान IT हे आहे काय? आणि म्हणून जेव्हा मी मंत्री झालो, शोध घेण्याचा प्रयत्न केला. हे आहे काय आणि त्यानंतर माझ्या लक्षात आलं, **माहिती तंत्रज्ञान म्हणजे दोन माणसांमधल्या संवादाचा हा चौथा टप्पा आहे.**

दोन माणसांमधला पहिला संवाद हा हावभावांनी झाला. कारण माणसाला बोली भाषा येतच नव्हती. अर्थात ही मूळ भाषा आहे आणि कधी कधी याची गरज पडते. परवा मी इंडोनेशियाला गेलो होतो. एक दिवस बालीला जाऊन आलो तिथे समुद्र फार चांगला आणि म्हणून मला असं वाटलं आपण ते स्कूबा डायव्हींग असतं १००० फूट समुद्राच्या खाली गेलं तर आपल्याला एक नवं जग पहायला मिळतं. म्हणून मग तो ऑक्सिजन मास्क वगैरे घेऊन ते नेतात. भीती वाटत होती पण बायको सारखी म्हणत होती, काय होतंय, काही होत नाही. तर म्हटलं, पुन्हा नाही गेलो तर सगळ्यांना सांगायची धरी येऊन. हे तिथे गेले पण उडी मारली नाही. मग हिमतीने उडी मारली. पण जाताना त्यांनी मला जे शिकवलं ती पहिली भाषा होती. कारण तुम्ही बोलायला तोंड उघडलं तर नळकांड बाहेर येईल. कारण नाकाने श्वास घेता येत नाही. मग तुम्ही तिथेच तळाशी रहाल. मग म्हणून बोलायच नाही. तर तुम्हाला त्रास झाला काही झालं तर मी तुम्हाला हाताच्या खुणेनं विचारीन, कसं आहे? तर तुम्ही खुणेनच सांगायचं चांगलय! बरोबर वाटत नसेल तर हातानेच सांगायचं, नाही वावा वर चल. खाली जायचं तर खाली. ती होती पहिली भाषा. दुसरी आपण हुडकून काढली बोली भाषा. तिसरी आपण हुडकली लेखी भाषा आणि लेखी भाषेची सर्वात मोठी क्रांती झाली १५ व्या शतकात ज्यावेळी छापखान्याचा शोध लागला. कारण ज्ञान साठवणं आणि हवं त्या वेळी ते वापरणं हे जे काम बुद्धी करते ती हळूहळू शिल्पकलेतून कागदावर येईपर्यंत १५ शतक आलं. आता जी भाषा आली आहे ती मानवी संवादाचा चौथा टप्पा आहे. जी भाषा बोली आणि लेखीच्या पुढे ज्याला आपण 'डिजिटल लँग्वेज' म्हणतो त्याच्यात गेली आहे. आणि आता ही लेखी बोली काहीच राहीलेली नाही. यापुढे ज्याला इंग्रजीत Voice Vidionic Data म्हणतात. म्हणजे चित्र लिखाण आणि बोललेला शब्द हा तिनही कॉंप्रेस करून तियांनाही 0-1-0-1 च्या भाषेत टाकून सरळ पाठवायचं ही नवी भाषा आहे. जावा काय आहे हे मला लहानपणी विचारलं असत तर मी म्हटलं असत मोटार सायकलचं नाव आहे. आता म्हणतो ही नवी भाषा आहे. स्वाभाविक पणे आता ज्याला ही नव्या युगातली भाषा कळणार नाही तो अडाणी, ज्याला कळेल तो सुशिक्षित. So The Computer has basically changed the defination of litracy. साक्षरता म्हणजे लिहिता वाचता येणं हे आता वदललं. पुढच्या ५ वर्षांत ज्याला संगणक यंत्राचा वापर करता येणार नाही तो निरक्षर समजला जाणार आणि ज्याला येतो तो साक्षर समजला जाणार. अशी साक्षरतेची व्याख्या बदलली आणि म्हणूनच तुम्हाला, मला, या नव्या समाजात रहायचय त्याला, ही नव्या संवादाची भाषा शिकणं अत्यंत आवश्यक झालेलं आहे. कधी कधी लोकांना वाटतं भारत इतकी प्रगती यात का करतोय? याची अनेक कारण सांगितली जातात. परवा एकाने महत्त्वाचं कारण सांगितलं, भारत माहिती तंत्रज्ञानात प्रगती यासाठी करतोय की आपल्या प्राथमिक शाळातून कॉम्प्युटर नाही येत आणि ते म्हटले, तुम्ही ते आणू नका. तुमचं धोरण चुकीचं आहे. ७ वी पर्यंत कॉम्प्युटर आणू नका.

---

हिंदु जातीचा यातच गौरव आहे की, तिनं कधीही कुणाच्या रक्तानं भूमी भिजवली नाही.

आदली, पावकी, दिडकी हेच शिकवा. त्याने जी बुद्धी तासून तयार होते ती कॅल्क्युलेटर ने होत नाही. एकदा कॅल्क्युलेटरची सवय लागली की २ नी २ चार हे चटकन सांगता येत नाही. कॅल्क्युलेटर वर बटणं दाबून तो शोध लावल्यासारखा चार हे उत्तर काढतो. आणि म्हणून कोणी तरी म्हटलंय, गणकयंत्राचा वापर जरूर करा पण बुद्धी नावाचा जो कॉम्प्युटर आहे, माणसाचा मेंदू तो जगातल्या कोणत्याही गणक यंत्रापेक्षा मोठा आहे. कारण तुम्ही जगातलं कितीही मोठ गणकयंत्र आणलं तरी ते तुम्हाला ती माहिती देऊ शकत नाही जी त्याला आधी सांगितलेली नसते. Computer can not tell you anything which is not already told to him. We can not creat a data. किंवा कॉम्प्युटर उठून चालायला लागला असं होत नाही. म्हणून मानवी मेंदूची तुलना नाही.

पण मला कधी कधी असं वाटतं की, आज जगात आपलं नाव आहे. कदाचित या गणिती बुद्धीचं असेल. इंग्रजांनी १५० वर्षे राज्य केलं त्याबद्दल त्यांचे आभार मानण्याची वेळ ५० वर्षांनंतर येईल असं मला कधीही वाटलं नव्हतं. पण इंग्रजांनी १५० वर्षे राज्य केल्यामुळे इंग्रजी भाषा जी आपण शिकलो आणि आपली इच्छा असो वा नसो, यावर आपण वाद वेगळा घालूया, इंग्रजी भाषा माध्यम असावी नसावी त्याला दोन्ही बाजू आहेत. आज भारतीय माणसाला इंग्रजी भाषेचं ज्ञान आहे जे चीनी, जपानी, जर्मन यांना नाही. आपण म्हणून IT च्या क्षेत्रात आज आपण जगात उभे आहोत. स्वदेशासाठी जरी आपल्याला भारतीय भाषेची गरज असली तरी जगावर प्रभुत्व गाजवण्यासाठी आपल्याला जी इंग्रजी भाषा येते ती कधीही सुटता कामा नये. यावरही आपल्याला पुढील काळात भर दिला पाहिजे. आणि म्हणून माझ्या मंत्रालयाच्या दोन योजना आहेत; ज्यांना इंग्रजी येते त्यांना ते उत्तम यावं आणि त्यांनी आमचा असा अंदाज आहे २०१० साली अडीचलाख हजार कोटी रुपये, ( डॉलरमध्ये सोप असतं 50 Millium doller. थोडक्यात वाटतं ते, पण आपल्याला रुपयातच पाहिजे!) याचे कदाचित ३ लाख हजार कोटी होतील, इथपर्यंत व्यवहार होईल. त्यासाठी आपल्याला बाहेरसाठी इंग्रजीची कास धरलीच पाहिजे. आणि म्हणून या तंत्रज्ञानाने केलं काय, पूर्वीच्या काळात पैसा प्रेरणा होती. कुठलाही उद्योग सुरू करण्यासाठी, मानवी श्रम मिळायचेच. ते नेहमीच असणार आहेत. परंतु **It was a capital based Economy now it is a knowledge based Economy** आणि हा ज्ञानावर आधारित असल्याने दुनियेच्या इतिहासात पहिल्यांदा लक्ष्मीवर सरस्वतीची मात होऊ शकते हे गेल्या ५ वर्षांमध्ये सिद्ध केल्यामुळं आता आपला पिता लक्ष्मीपुत्र आहोत की नाही याचा विचार न करता आपण सरस्वतीची आराधना केली तरी लक्ष्मी पायाशी लोळू शकते, असं नव माहिती तंत्रज्ञानाचे क्षेत्र हे हिंदुस्थानी माणसाला जगभर मिळतयं. आणि म्हणून मला आठवतंय, ज्यावेळी मी स्टॅंडफर युनिव्हर्सिटीत गेलो त्यावेळी तिथे एक माणूस मला भेटला. कावासाकी (नाही. मोटरसायकल कावासाकी वाला नाही!) तुमच्यापैकी ज्याचा थोडा IT शी संबंध आहे त्यांना माहिती असेल आपण जो माऊस वापरतो या माऊसचा शोध त्या कावासाकीने लावला आणि त्याने मला हाच प्रश्न विचारला की, Why Indians are so good at IT? मी त्याला उत्तर देण्याच्या ऐवजी काऊंटर प्रश्न विचारला, The instrument you invented why did you call it as mouse? तो म्हणे, It's a good question. अमेरिकेमध्ये ज्या प्रश्नाचं उत्तर लगेच देता येत नाही त्याला, It's a good question म्हणण्याची पद्धत आहे ! थोडा विचार करून त्याने म्हटलं की, This looks like mouse & when I use it it jumps like mouse. मी म्हटलं, I don't know, why did you call it as mouse, but thats the basic reason as you called it mouse, Indians are running over IT. तो म्हणाला, What do you mean? मी म्हटलं, You may not know accidently you called it mouse, but in my country it is the vehicle of lord 'Ganesha' which is the God of the Education in my country & so Indians are used to stay with mouses from there

childhood. आणि म्हणून आम्ही पुढे जातोय.

Highly Educated IT Profetionals, या देशात वर्षाला १ लाख तयार होतात. आमची योजना अशी आहे २००५ सालापर्यंत वर्षाला ३ लाख IT Prifetionals तयार व्हावेत. त्यासाठी आम्ही नवीन IIT तर खोलू शकत नाही. कारण आपल्यापैकी अनेकांना कल्पना नसेल एक IIT सुरू करायची असेल तर १ हजार कोटी रुपयांचा खर्च लागतो. परंतु आम्ही विचार केला हिंदुस्थानात १७ रिजनल इंजिनिअरींग कॉलेजेस् आहेत किंवा आपली V.J.T.I. सारखी महत्वाची संस्था आहे यांना कमी पैशामध्ये IIT च्या स्तराला आणता येईल म्हणून ६ IIT च्या पुढे अजून या २५-३० संस्था निवडून यांना केंद्रीय सरकारच्या खर्चाने IIT च्या लेव्हलला आणण्याची कल्पना आहे. म्हणून आम्ही इंजिनिअरींग कॉलेजमधला कोटा डबल केलाय. महाराष्ट्राच्या सर्व कॉलेजमध्ये म्हणून पॉलीटेक्निकचा निर्णय आम्ही राज्यावर सोडणार आहोत. कारण जी ताकद आपली या शैक्षणिक क्षेत्रात आहे ती पक्की करण्यासाठी ज्या योजना आखाव्या लागतील त्या आखून पुढे नेण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत. आणि मला असं वाटतं, बेडेकरांनी जी मदत मागितली ती इतकी आपोआप येणार आहे की त्यासाठी मला वेगळं काही सांगण्याची गरज नाही. जो जो IT त प्रगती करण्याचा प्रयत्न करेल त्याला त्याला सरकारकडून काही ना काही मदत देण्याची, आमची शिक्षणाच्या क्षेत्रात मात्र निश्चित मदत होणार आहे. पूर्वीची आपली विषमता होती गरीबी व श्रीमंतीची, साक्षर निरक्षरतेची आता नवी विषमता येणार आहे. ज्याला माहिती तंत्रज्ञानाची भाषा कळते तो आणि ज्याला ती कळत नाही तो आणि या दोघातलं अंतर हे साक्षर निरक्षरापेक्षा किंवा गरीबी श्रीमंतीपेक्षा इतकं विलक्षण असणार आहे, ज्याची आपण कल्पना करू शकत नाही. आणि म्हणून माहिती तंत्रज्ञान, That is lightly to creat such a digital divided very few will have billions of Rupees with them & few will not just understand what is happenning aound that आणि म्हणून आपल्या सगळ्यांना मिळून हा प्रयत्न करायचाय की, ही नवी भाषा आत्मसात केली पाहिजे. ही उच्च विद्या विभूषीत IT आणि टाय याचा जवळचा संबंध असला पाहिजे असं नाही. धोतराला सुद्धा IT कळू शकते. त्या दिशेने जाण्याची आपल्याला गरज आहे आणि म्हणून इंग्रजीतून भारतीय भाषांकडे, उच्च वर्गीयांकडून मागासवर्गीयांकडे, शहराकडून खेड्याकडे जोपर्यंत आपण माहिती तंत्रज्ञानाची दिशा फिरवत नाही, आणि कधी कधी मला असं वाटतं ती फिरवणं सहज शक्य आहे. आज If IT is properly used the digital diviad can become digital unite. आज खेड्यातल्या माणसाला जे मिळत नाही ते सहज त्याला देता येणं या भाषेचा वापर करून शक्य आहे. पण ती दिशा आपण सगळ्यांनी पकडली पाहिजे.

आपला देश खूप प्रगती करतोय पण अजून पुष्कळ पुढे जायचंय. मी तीन वर्षांपूर्वी चीनमध्ये जाऊन आलो. त्यांची प्रगती अद्भुत आहे. आपल्या देशामध्ये जास्तीत जास्त ३ कोटी फोन आहेत. चीनमध्ये ११ कोटी फोन आहेत. भारतात मोबाईल वाल्यांची संख्या २५ लाखाच्या आसपास आहे. चीनमध्ये ५ कोटी लोकांच्या हातात मोबाईल फोन आहे. चीनची लोकसंख्या आपल्या सव्वापट असेल पण ते आपल्या सारखेच आहेत. आपल्याच वेळी जन्माला आलेत. आपल्याच इतके गरीब आहेत. सगळं सारखंच. मी अमेरिकेशी तुलना करत नाही. मी सोडून दिल ते. म्हणून आपल्याला खूप पुढे जायचंय. भारत हा जगतगुरू आहे हे ऐकायला बरं वाटतं, पण जगात गेलं की कोण विचारत नव्हतं. त्याला देशाचच नांव माहीत नाही तर गुरू म्हणणं फारच लांब. कोणती country? म्हणायचे. यामुळे हे आपलं वर्षानुवर्षाच पिढ्यान् पिढ्यांच स्वप्न होतं की जगत् गुरूत्वाची ताकत आमची आहे. भारत जगाला मार्गदर्शन करू शकतो. ही भाषा जी आपण एकमेकांना संभाळण्यासाठी बोलत होतो. For the first time in

(पान क्र. २४ वर)

# शिवाजीराव भोसले यांच्या अविस्मरणीय भाषणाचा वृत्तांत

*एखादे भाषण, त्या भाषणाचा विषय, त्याचा वक्ता यांच्यामुळे अविस्मरणीय होते. अशाच एका अविस्मरणीय व्याख्यानमालेचे हे शब्दांकन आहे. विवेकानंद जयंती निमित्ताने मुद्दाम या अंकात देत आहोत. शब्दांकन माननीय टिल्लू सरांनी केले आहे. - कार्यकारी संपादक*

(दि. ११ डिसेंबर १९९८ ला **ज्ञानसाधना महाविद्यालयात झालेल्या गुरुवर्य स. वि. कुलकर्णी व्याख्यानमालेचे** पहिले पुष्प प्राचार्य श्री. शिवाजीराव भोसले यांनी गुंफले. व्याख्यानाचा विषय - 'विवेकानंद : जीवन आणि तत्वज्ञान.')

विवेकानंदांचे आजोबा कर्मठ होते. ते संन्यास घेण्यासाठी घराबाहेर पडले. विवेकानंदांचे वडिल ईश्वर मानीत पण ते अॅटर्नी जनरल असल्यामुळे पुराव्याशिवाय काही खरे मानत नसत. विचारांच्या मुशीत घासूनपुसून ते निर्णय घेत. त्यांच्या घरात येणाऱ्या जाणाऱ्या पारशी, गुजराथी, बंगाली याप्रमाणे स्वतंत्र हुक्का असे. एक दिवस नरेंद्र कोणी नसताना सगळ्या हुक्क्यांना तोंडात घालून बघत होता. तेवढ्यात वडिल आले. ते म्हणाले, तू काय करतोस. तर नरेंद्र लगेच म्हणाला, मी माझी जात बघतोय. त्याच्या मनात, स्वत: कोण? याविषयी चलबिचल होती. ते संगीत शिकलेले होते. त्यांच्या घरात शास्त्रोक्त संगीताची आवड होती. व विवेकानंदांची अशी खात्री होती की ज्याला एकाग्रता पाहिजे त्याला संगीताची आवड असलीच पाहिजे. विवेकानंद फक्त बी.ए. होते व तेही सेकंड क्लास. पण त्यांनी सर्व विश्वकोश (१०) खंड वाचले होते. त्यांना ते अवगत होते. पण त्याचबरोबर ब्रह्मचर्याविषयी आस्था होती. त्यांची खात्री होती की, मला ईश्वर या शक्तीविषयी माहिती मिळवायची आहे व ती मिळविण्यासाठी ब्रह्मचर्य असणे जरुरीचे आहे. शिवाय त्यांना व्यायामाशिवाय शरीर निरोगी रहाणार नाही याची खात्री होती. त्यामुळे ते नियमित व्यायाम करत. ते कॉलेजमध्ये असताना त्यांचे इंग्रज प्राचार्य जस्टी हे 'वर्डस्वथ' शिकवत असताना वर्डस्वथ हा निसर्गात रममाण होत असे. डोंगर, दऱ्या, खळाळणारे झरे, आकाश, तारकांचा पुंज, फुले, झाडे, फळे हे पहाताना त्याला भावसमाधी लागत असे. त्यावर नरेंद्रने विचारले, गुरुजी याचा आपण अनुभव घेतला आहे का? त्यावर त्यांनी सांगितले की कालिकतला रामकृष्ण नावाचा एक गुरु आहे. त्याला तशा प्रकारचा अनुभव आहे. झाले, मग त्याच्या शोधात ते होते. त्यांना बंगाली, इंग्रजी, संस्कृत, हिंदी वगैरे अनेक भाषा अवगत होत्या. त्यांचे मित्र नातेवाईक चटर्जी यांच्याकडे रामकृष्ण येणार होते. तेव्हा त्यांचे स्वागत करण्यासाठी नरेंद्राला गाणे म्हणावयास सांगितले. ही त्यांची व रामकृष्णांची पहिली भेट. रामकृष्णांना त्यांचे गाणे आवडले व त्यांनी त्याला कालिकतला ये म्हणून सांगितले.

परंतु ते अस्वस्थ होते. ईश्वर आहे का ? आहे तर कोठे आहे? कुणी त्याला बधितले आहे का? त्याची प्रचीती मिळते का? विवेकानंद खरोखर विद्याव्यासंगी होते.

•••

( १२ डिसेंबरला झालेल्या दुसऱ्या व्याख्यानात रामकृष्ण परमहंसाविषयी त्यांनी माहिती दिली. गुरु शिष्य संबंध समजण्यासाठी ती आवश्यक आहे. ) कोणी एक कालिकत येथील राणी हिच्या स्वप्नात कालिमाता येऊन तिला म्हणाली, माझ्यासाठी देऊळ बांध. रामकृष्ण लहानपणापासूनच देवाचे भक्त होते. ते आईला विचारीत, शाळेत गेल्याने देव भेटेल का? आई म्हणाली, नाही. मग ते शाळेत गेलेच नाहीत. राणीने बांधलेल्या देवळाला पुजारी हवा होता. पण तो कोणी मिळेना. तेव्हा तिच्या एका

जोपर्यंत माझ्या जन्मभूमीतील एक कुत्रादेखील उपाशी आहे, तोपर्यंत त्याला खायला देणं माझा धर्म आहे.

सरदाराने तिला सांगितले की, हे देऊळ तू ब्राम्हणांना देऊन टाक. मग बघ किती ब्राम्हण पुढे येतील ते. तेथेच रामकृष्णांचा भाऊ गदाधर संस्कृत पाठशाळेत होता. हा संस्कृत शिकवणारा पुजारी म्हणून चांगला आहे म्हणून राणीने त्यांच्याकडे देऊळ सुपूर्द केले. पुढे रामकृष्ण न शिकता पुढे जाऊ नये म्हणून आईने त्याला या मोठ्या भावाकडे पाठवले. सुरुवातीला फुले आण, वाती वळ अशी लहान लहान कामे करणाऱ्या, रामकृष्णाकडे काही दिवसांनी पूजेचे काम अंगावर आले. कारण त्यांच्या भावाचे निधन झाले. त्यातही रामकृष्णांना वाटले, एवढी देवीची भक्तीभावे पूजा करणाऱ्या भावाला मरण का यावे? ते तासन् तास देवळात बसत. ते मातेला विचारीत, 'माते मी तुला आवडणारा नैवेद्य आणतो तो तू खात का नाहीस? मग तो नैवेद्य कशाला बनवायचा?' एकदा ते निर्वाणीला आले व त्यांनी ठरवले, आज माता दिसली नाही तर आपला घात करून घ्यायचा व धारदार सुरा हातात घेऊन ते आपला घात करून घ्यायला निघणार तोच सर्व अणुरेणुत भरून राहिलेल्या कालीकामातेने त्यांना दर्शन दिले. असे लिहिले आहे.

बऱ्याच तात्विक विचारवंतांच्या मते त्यांना स्वप्न वगैरे पडले असावे किंवा आभास झाला असावा. तर अशा रामकृष्णांनी पुस्तके वाचून नव्हे पण साधनेने प्रत्येक धर्माचा अभ्यास केला. कुराण, बायबल, जैनांचे तीर्थंकर, बुद्ध धर्म याचा अभ्यास केला व त्यांनी अनुभूती घेतली की सर्व धर्म एकच आहेत.

तर अशा या नरेंद्राला जेव्हा रामकृष्ण भेटले तेव्हा त्यांच्या या साक्षात्कारी पुरुषाबद्दल उत्सुकता होती. पण त्यामुळे ते जेव्हा भेटत तेव्हा ते विचारीत, तुम्ही देव पाहिला आहे असे म्हणता मग तो मला भेटेल ना? भेटला तर कसा भेटेल? तेव्हा ते सांगत, प्रत्येक या निसर्गाच्या अणुरेणुत तो आहे. फक्त तो साधकालाच दिसतो. त्यावर नरेंद्र, मग साधक कसा असावा? वगैरे चर्चा त्यांच्याशी करीत. त्यावर ते सांगत, जो या भावनेशी एकरूप होईल त्याला तो भेटल्याशिवाय रहात नाही. या उत्तराने नरेंद्राचे समाधान होत नसे. पण त्यांना वाटे हा माणूस प्रांजळ आहे, प्रेमळ आहे. म्हणजे यांच्या बोलण्यात सत्यता आहे. राससमणी या सुंदर बाईने त्यांच्याकडून काही तंत्रविद्या वगैरे सुद्धा प्रयोग करून घेतले. त्यांचे लग्न झाले होते व त्यांचे आपल्या पत्नीवर प्रेम होते. ५० व्या वर्षी त्यांचे कॅन्सरने (गळ्याच्या) निधन झाले. त्यांना जेव्हा कॅन्सर झाला तेव्हा नरेंद्रने त्यांना विचारले की, तुम्हाला देवी भेटते मग तिला तुम्ही का सांगितले नाहीत की काहीतरी उपाय करून मला बरं कर. कारण मला या लहान संन्यासी मुलांना अजून सांभाळायचे आहे. त्यावर ते म्हणाले, की मी असे विचारले तेव्हा देवीने सांगितले तुला खाण्यासाठी तोंड कशाला हवे? ही एवढी तोंडे तुझ्यापुढे आहेत त्यांनी खाल्ले म्हणजे झाले. स्वत:ची काळजी करू नको तर इतरांची काळजी कर.

ते गेल्यावर नरेंद्रने व इतर अनुयायांनी भगवी वस्त्रे परिधान करून भारताचा दौरा केला. ते स्वत: भारतभर हिंडले. ते पुण्याला आले, टिळकांना गाडीत भेटले. रामकृष्ण बोधामृत मुलांना वाचावयास दिलात तर मुले बिघडणार नाहीत. भटकत असताना नरेंद्र विश्वनाथ दत्त कुठेही टिपणे वगैरे न काढता भाषण करे. त्यांच्या भाषणाचे ९ खंड प्रसिद्ध झाले आहेत. १० वा प्रसिद्ध होणार आहे. सगळे युवांसाठी आहेत. ते सांगत, युवकांच्या अंगात सळसळणारे रक्त हवे. त्यांनी बघितले की एखाद्या संघटनेशिवाय हे भारताच्या उत्थानाचे कार्य अशक्य आहे व ती संघटना त्याग बुद्धीने काम करणारी हवी म्हणजे मिशन या पद्धतीने. रामकृष्ण व विवेकानंद यावर नोबेल पारितोषिक विजेता मोर्ले याने Sight of Ramkrishna & Vivekananda अशी दोन उत्कृष्ट इंग्रजी पुस्तके लिहिली आहेत. त्यात त्यांनी रामकृष्णांबद्दल एकच सांगितले आहे की, त्यांचा सर्वधर्म समभाव खरोखरच अनुभूतीला आला होता. विवेकानंदांचे तेच पहिले ब्रीदवाक्य होते Harmony

---

in Religion. सर्व मानवांबद्दल प्रेम (Love for Humanity), त्यागी व संन्यासी वृत्ती. समाजोपयोगी काम व यातून मानवजातीचे उत्थान. ते प्रवास करत करत गोव्याला आले. मडगाव येथे देवळात तबलावादनाचा व गाण्याचा कार्यक्रम झाल्याची बातमी आहे. कोणी ऑस्ट्रेलियन वादक होता. तो अंग हलवून तबला वाजवत होता त्यावर. नरेंद्राला राहवले नाही. त्याने सांगितले एवढी शरीराची हालचाल कशाला हवी? मग त्याने वाजवून दाखवले.

एके ठिकाणी फिरताना त्यांना एका धर्मशाळेत उतरले असताना देवापुढे लावलेल्या दिव्याच्या अंधुक प्रकाशात एक धूसर आकृती दिसली. त्याने विचारले, तू कोण आहेस? तो म्हणाला, मी एक संन्यासी आहे. विवेकानंद म्हणाले, मी पण एक संन्यासी आहे. तू काय करतो? तो म्हणाला, मी पण अनुभूती घेत भटकत आहे. नरेंद्र म्हणाला, मी पण तेच करीत आहे. पण तू हे का करतोस? त्यावर तो म्हणाला, मी एक अट्टल चोर होतो. मला कळले की पवनहारी साधूंजवळ चांदीची भांडी आहेत. तेव्हा ती चोरण्यासाठी मी गेलो. सर्व भांडी उचलली आणि जाऊ लागलो तर संन्यासी माझ्या मागे आले आणि म्हणाले, ही दोन राहिलेली भांडी पण घेऊन जा. तुला उपयोगी येतील. मी जाऊ लागलो तर त्यांनी माझा हात धरला व मग मला माझे पूर्वजन्म आठवले व माझी सर्व पापकर्मे गळून गेली. मी त्यांना म्हटले, आता मला कशाचाही उपयोग नाही. मी त्यांच्या पाया पडलो व तेव्हापासून असा भटकतो आहे.

तेव्हा या पवनहारी साधूंना भेटायचे त्यांनी ठरवले व एव्हीतेव्ही रामकृष्ण गेलेच आहेत तेव्हा दुसरा गुरू करावयास कोणती हरकत नाही म्हणून ते त्यांना जाऊन भेटले. तेव्हा तो साधू म्हणाला थांब व मग त्यांनी पूजेमधील रामकृष्णांचा फोटो आणून दाखविला व म्हणाला, या साक्षात गुरूच्या सहवासाचा, नित्य दर्शनाचा, कृपेचा लाभ तुला मिळाला असतांना तुला गुरू कशाला हवा? त्यावर नाही, मी इथे येतो म्हणून नरेंद्राने हट्ट धरला. तेव्हा तो म्हणाला, बरे येतास तर ये व दुसरे दिवशी तेथे येण्याचे ठरले. पण दुसऱ्या दिवशी ते जाण्यास निघाले तर रामकृष्णांचे दर्शन त्यांना घडले व ते उभे राहून करूण नजरेने त्यांच्याकडे पहात होते. असा एक दिवस, दोन दिवस, तीन दिवस, एक आठवडा, दोन आठवडे, तीन आठवडे गेले. पण तीच घटना रोज घडे. तेव्हा मग विवेकानंदांनी ठरवले की रामकृष्णांची भक्ती करावयाची.

असे प्रवास करीत ते कन्याकुमारीला आले. तेथे एका बेटावर तीन दिवस बसले व ते तेथे कन्याकुमारीला एक विचारत होते, माते मला भारतीय लोकांचे दारिद्र्य, दैन्य बघवत नाही. मी माझ्या भारतमातेसाठी काय करू? मला दृष्टी दे. पाणी, वारा, पाऊस, भूक या कशाचीही पर्वा त्यांनी केली नाही व मग जेव्हा त्यांना साक्षात्कार झाला की, जर मला माझा देश बलवान करावयाचा असेल तर मला युवा पिढीला तयार करावे लागेल. मग परत भ्रमंती करीत ते मद्रासला आले. तेथे ते असताना त्यांच्या मागे काही कॉलेजच्या मुलांचा ग्रुप लागला. त्यांनी बघितले या संन्याशाला इंग्रजी चांगले येत आहे व संस्कृत वेदांचाही त्याचा अभ्यास आहे. त्यांनी मग त्यांची भाषणे सगळीकडे ठेवली. त्यावेळी अमेरिकेत कोलंबसने अमेरिका खंडाचा शोध लावून चारशे वर्षे झाली होती व त्याचा महोत्सव होता. त्यात इतर संगीत वगैरेच्या कार्यक्रमाबरोबरच Parliament of Religions मध्ये सर्व राष्ट्रामधून प्रत्येक धर्माचा एक असे धर्मोपदेशक बोलवण्याचे ठरले. त्याप्रमाणे हिंदुस्थानामधूनही एक धर्मोपदेशक बोलावण्याचे ठरले. त्या धर्मोपदेशक पाठवण्याच्या कामात अडचण अशी होती की, संस्कृत जाणणाऱ्याला इंग्रजी येत नसे व इंग्रजी प्राध्यापकाने संस्कृत वेद विद्यांचा अभ्यास केलेला नसे. त्याप्रमाणे दोन्ही येणारे त्यावेळी फक्त एकटे विवेकानंदच होते. पण ते अतिशय साधे, भोळे होते. त्यांना जाण्यासाठी पैसे वगैरे काही नव्हते. मग ठिकठिकाणच्या लोकांनी ते जमा करून

---

ही सारी माणसं हाच तुमचा ईश्वर होय.

त्यांना पाठवले. शेवटी जाण्याचा दिवस उजाडला व सहकाऱ्यांना निरोप देतांना डोळ्यात पाणी आणून ते म्हणाले, मी मातृभूमीला तुमच्यावर सोपवून जात आहे. शेवटी बोटीवर चढतांना त्यांनी माती कपाळी लावली व म्हणाले, माते तुझी महती सांगण्यासाठी मी परदेशी जात आहे. मला स्फूर्ती दे.

***

शेवटच्या दि. १३-१२-९८ च्या ३ ऱ्या व्याख्यानात शिवाजीराव म्हणाले, विवेकानंद शिकागोला जाण्यासाठी ३१ मे रोजी बोटीवर चढले व ६० दिवसांनी म्हणजे ३१ जुलैला ते बोस्टन या अमेरिकन बंदरात उतरले. तेथे गेले तर त्यांना काय कळले की, आपणाला ओळखपत्र नाही व त्यामुळे आपण हिंदू धर्माचे प्रतिनिधी म्हणून भाग घेऊ शकणार नाही. आपल्याजवळ काही दिवस पुरतील एवढे पैसे आहेत. भरपूर अमेरिका पाहूया. म्हणून ते गाडीत बसले. तर एक सनबर्ग बाई त्या डब्यात होती. या संन्याशाला बघून तिने विचारपूस केली. तेव्हा विवेकानंदांनी तिला स्वतःची माहिती सांगितली. तेव्हा ती म्हणाली, मला असे दिसते आपल्याजवळ थोडे पैसे आहेत व त्यात आपल्याला २७ सप्टेंबर पर्यंत दिवस घालवायचे आहेत. तेव्हा आपण माझ्याकडे जागा आहे तेथे रहावे. तेथे रहात असताना बाईंनी त्यांची एका व्हाइट नावाच्या प्रोफेसर बरोबर ओळख करून दिली. अमेरिकेत प्रोफेसर म्हणजे त्याला बऱ्याच वर्षांनी ती पदवी मिळते. तेव्हा असे प्रोफेसर महाशय स्वामींना भेटले व स्वामींबरोबरच्या चर्चेने भारून गेले. ते स्वामींना म्हणाले, तुम्हाला जागा नसेल तर तुम्ही इथे राहू शकता व तुम्हाला 'पार्लमेंट ऑफ रिलिजन' मध्ये प्रवेशासाठी लागणारे ओळखपत्रही मी देतो. त्या प्रोफेसरने काय सर्टिफिकेट द्यावे, Here is a man, who is more than all the learned professors in America.

यथावकाश ते शिकागोला गेले, पण ते पोहोचले तेव्हा काळोख झाला होता म्हणून ते थंडीवाऱ्यात गाडीच्या डब्यात सकाळपर्यंत झोपले. सकाळी ते उठले व इकडे तिकडे कोणाला विचारावे म्हणून शोधू लागले. पण त्यांना कोणी भेटेना. ते एका मोक्याच्या उंच जागेवर बसले. थोड्या वेळाने समोरच्या घराची खिडकी उघडली गेली व एक हिल बाई हा कोणी धर्मपरिषदेसाठी आलेला परदेशी असावा हे ओळखून त्यांच्यापाशी आली व म्हणाली आपण माझ्या घरी चलावे. मग सर्व आन्हिके उरकून मी तुम्हाला महोत्सवाला घेऊन जाते.

कोलंबस महोत्सव १७ दिवसांचा होता. पहिल्या दिवशी त्यांनी ठरवले की प्रत्येकाने आपली फक्त ओळख करून द्यावयाची. सर्व प्रतिनिधी तयारीनिशी आले होते व ते बोललेली फर्ड्या इंग्रजीमध्ये. विवेकानंदांना वाटले आपण बोलू नये. पण ओळख तर करून द्यावयाला हवीच होती. सर्वात शेवटी ते उभे राहिले. तेव्हा ते म्हणतात माझ्या घशाला कोरड पडली होती. त्यांनी सर्वप्रथम रामकृष्णांचे स्मरण केले व आपण सदैव माझ्या पाठीशी उभे असता तसे आताही रहा अशी इच्छा केली. मग सरस्वतीची स्तुती केली व मग मातृभूमीचे स्मरण करून ते म्हणाले, 'Brothers & Sisters of America' आणि काय सांगावे! ते ऐकल्याबर सर्व सभागृहातले श्रोते उभे राहिले व त्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्या त्यांच्या शब्दांना दाद दिली. मी अशा एका धर्माचा प्रतिनिधी म्हणून उभा आहे जो धर्म सर्व धर्मांची जननी आहे. जो धर्म ज्याचा कुणीही संस्थापक नाही. जो ऋषींच्या मुखातून वेदरूपात जन्माला आला, ज्याच्यासाठी अनेक साधुसंन्यासी झटले असा हा माझा धर्म कोणत्याही धर्माला वाईट लेखत नाही. हे त्यांचे व्याख्यान ४८५ शब्दांचे ४॥ मिनिटांत संपले. पण सगळे श्रोते मंत्रमुग्ध झाले. शेवटच्या दिवशी त्यांचे समारोपाचे भाषण तर फारच चांगले होते. त्यात त्यांनी योग, प्राणायाम, वमन, रेचक, समाधी वगैरेचे अस्खलीत इंग्रजीत विवेचन केले. मग बऱ्याच लोकांनी त्यांना भाषणासाठी बोलाविले. या सर्व

---

जो एकान्तात असताना लोकान्तात असल्याइतका आनंदात असतो आणि जो लोकान्तात असतानाही एकान्तात असल्यासारखा असतो तो खरा आध्यात्मिक धारणेचा पुरुष होय.

व्याख्यानांची पुस्तके आहेत. ते त्या हिल बाईमुळे व गोल्डविन नावाच्या बाईमुळे ते शक्य झाले. ३॥ वर्षे स्वामी अमेरिकेत होते ते इंग्लंडलाही गेले. कोलंबिया व हार्वर्ड विद्यापीठात त्यांना संस्कृतचे विद्यासन पण दिले गेले पण ते त्यांनी स्वीकारले नाही. रस्किन शाळा चालवणाऱ्या मार्गारेट बाईच्या, ज्यांच्या जीवनात दोन प्रियकरांच्या विरहामुळे नैराश्य आले होते व त्यानंतर त्यांनी आत्म्याच्या उन्नतीकडे लक्ष केंद्रित केले होते त्या बाईंनी स्वामींशी चर्चा केली व ती त्यांची शिष्या होऊन भारतातील गोरगरीबांच्या मदतीसाठी भारतात येऊन राहिली. बेलूर मठात. स्वामींचा जीवनप्रवास ४० व्या वर्षी संपला तो सतत भाषण देण्यामुळे व हजारोंच्या संख्येने येणाऱ्या श्रोत्यांपुढे आकांताने ओरडून. स्वामींनी तेव्हा सांगितलेली भारताची सामाजिक भूमिका आजही तीच आहे.

१) Narrow outlook
२) Perversion of Religion
३) Neglect of masses
४) Neglect of women
५) Lack of business integrity.

ते युवकांना सांगत I want men, men strong, vigorous, wilful to uplift the mother land from pouring & sorrows & give her same golden nabbing days.

सर्व युवकांनी तसा प्रयत्न करावा.

***

## भाषणांच्या संपादनाबद्दल

भाषणांचे संकलन करून त्यांचा दिशामध्ये समावेश करावा यामागे ही भाषणे ज्यांना ऐकायला मिळालेली नाहीत त्यांची सोय व्हावी, संदर्भासाठी यातील विचार उपलब्ध व्हावेत हा माझा हेतू आहे. भाषणांचे कॅसेटस् ऐकून लेखन करणे हे अतिशय जिकिरीचे काम असते. ते आमच्या संपादक मंडळातील दीपालीने न कंटाळता केले आहे याची विशेष नोंद करणे आवश्यक आहे. दीपाली भाटकरच्या प्रयत्नांमुळे ही भाषणे देता येणे शक्य झाले आहे. नम्र स्वभाव, चिकाटी, नवीन शिकण्याची हौस ही तिची स्वभाव वैशिष्ट्ये महत्त्वाची आहेत.

बोलताना वक्ता त्याच्या शैलीत बोलत असतो. बोली भाषा वापरत असतो. अशी भाषणे छापताना ती प्रमाण भाषेत करून घ्यावीत असे एक मत आहे. परंतु प्रमाण भाषेत त्याचे रूपांतर करताना त्या वक्त्याची शैली प्रतिबिंबित होत नाही. त्यामुळे येथे संपादन करताना मूळ शैलीवर परिणाम न करता संपादन करण्याचा प्रयत्न आहे. वक्ता त्या भाषणाच्या संहितेतून वाचकांना जाणवला पाहिजे. त्याची शैली जाणवली पाहिजे. त्या दृष्टीने मूळ संहितेत कमीत कमी बदल केले आहेत. कॅसेटवरून शब्दांकन करताना जर अर्थबोधच झाला नसेल तर विसंगत वाटण्याची शक्यता असते. अशा जागी जर चालण्यासारखे असेल तर मूळ वाक्ये गाळूनच टाकली आहेत. त्यामुळे भाषणाच्या आकारावर व आशयावर काही परिणाम होणार नाही याची काळजी मात्र घेतली आहे.

**प्रा. मोहन पाठक**
कार्यकारी संपादक

# 'नचिकेत/प्राजक्ता गौरव सोहळा'
# कुलगुरू मा. श्री. भालचंद्र मुणगेकर यांचे भाषण

*शालान्त परीक्षेत मार्च २००० मध्ये आमच्या शाळेचा नचिकेत थोरात पहिला आला, तर आमच्या महाविद्यालयामधील प्राजक्ता सारंग विज्ञान शाखेत विद्यापीठात पहिली आली. त्यांच्या गौरवार्थ माननीय भालचंद्र मुणगेकर आले होते. या प्रसंगी त्यांनी व्यक्त केलेले विचार या भाषणात आहेत. -संपादक*

वि.प्र.म. चे सन्माननीय अध्यक्ष डॉ. बेडेकर, संस्थेचे पदाधिकारी, कॉलेजचे प्राचार्य, प्राजक्ता, नचिकेत, वि.प्र.म.शी संबंधित असलेले सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षिका, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि मित्रहो,

खरं तर नचिकेत व प्राजक्ता यांनी अभ्यासामध्ये जो इतिहास घडविला आहे त्यापेक्षा वक्तृत्वामध्ये जो इतिहास घडविला आहे तो पार करणे कठीण आहे.

मी या कार्यक्रमाला येण्याचे मान्य केले. खरे ते कठीण होते, कारण ३११ कॉलेजेस् आहेत आणि त्या प्रत्येक कॉलेजमध्ये पुढच्या ५ वर्षात १५-१५ दिवसांनी जायचे म्हटले तरी आणखी पाच वर्षे मला टर्म वाढवून घ्यावी लागेल. परंतु प्राचार्य पाटील यांनी इतका आग्रह केला आणि संस्थेविषयीही मी इतके ऐकले आहे त्यामुळे एक नैतिक जबाबदारी म्हणून अशा प्रकारच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे हे अनेक अर्थांनी मला आवश्यक वाटले. १६ मे २००० रोजी मी ११.३० वा. चार्ज घेतला, युनिव्हर्सिटीत व्हाईस चान्सलर म्हणून. तेव्हा मी असं म्हणालो होतो की, I want people Friendly University. लोकाभिमुख विद्यापीठ अशी माझी संकल्पना आहे. विद्यापीठ हे समाजापासून दूर असलेले, Intellectual, प्रकांड पंडित स्वायत्त संस्था असे मी मानत नाही. ज्या गोष्टीचा समाजासाठी उपयोग नाही आणि युनिव्हर्सिटी सुद्धा त्याला अपवाद नाही, आणि म्हणून मी सातत्याने असे म्हणतो की विद्यापीठ आणि शिक्षक, विद्यापीठ आणि समाज, विद्यापीठ आणि वेगवेगळे सामाजिक घटक, विद्यापीठ आणि विद्यार्थी, विद्यापीठ आणि प्रशासन, विद्यापीठ आणि शासन, या सगळ्यांच्यामध्ये एक खूप चांगल्या प्रकारचा डायलॉग हवा, एक चांगल्या प्रकारचा संवाद हवा. आणि अशा व्यापक भूमिकेतून या कार्यक्रमाला येणं आवश्यक आहे असं मला वाटलं.

सर्वप्रथम नचिकेत आणि प्राजक्ता या दोघांचेही मी विद्यापीठाच्या वतीने आणि व्यक्तीश: मुणगेकर म्हणून Not only as Vice Chancellor of University. अत्यंत मन:पूर्वक हार्दिक अभिनंदन करतो. खरं प्राजक्ताचा सत्कार जेव्हा B.Sc. चा रिझल्ट लागला तेव्हा विद्यापीठाच्या वतीने आम्ही केला होता. तेव्हा ती बोललीही होती. स्त्री आणि पुरुष या दोघांच्या मध्ये जेव्हा एकाच लेव्हलला दोघे असतात तेव्हा एकाच लेव्हलला असून देखील स्त्रियांचे मला जास्त कौतुक वाटतं. कारण स्त्री आणि पुरुष या दोघांच्या मध्ये Objectively Bias असूनही bias towards women आढळतो. याचं कारण तीन साडेतीन हजार वर्षांच्या इतिहासामध्ये पहिल्यांदा स्त्रिया अधिक मुक्त होण्याचा प्रयत्न करताहेत. आता प्राजक्ताचं पहिलं येणं हे त्याचं प्रत्यंतर आहे. आणि म्हणून मला स्वत:ला असं वाटतं की ज्या समाजामध्ये स्त्री अधिक मुक्त असते, स्वत:च्या व्यक्तिमत्त्वाचा अधिक चांगल्या प्रकारे विकास करू शकते, त्या समाजाला मी आदर्श समाज असे म्हणतो. सुशिक्षित समाज आणि निरोगी समाज या दोघांमध्ये महत्त्वाचा फरक आहे. Educated society & Healthy society they are two different things. जसं प्राध्यापक होणं, Phd. होणं, M.A., M.Sc. होणं, आणि खऱ्या अर्थाने ज्ञान प्राप्त करणं. They are not automatic things. मला M.A. ला शिकवायला प्रा. दांतवाला होते. त्यांनी ३०८ आर्टीकल्स लिहिली

Agriculture Development, Planning, Employment इ. वर. आणि त्यांना Phd. नव्हती. त्यातल्या प्रत्येक आर्टीकलला Phd. देता येण्यासारखी गोष्ट होती. प्रा. कांता रणदिवे मला शिकवायला होत्या, त्यांनी मला Economic Value Theory, Price Theory, Monatory Theory वगैरे शिकवले. त्यांनी स्वत:ची Economics मध्ये मुंबईची पदवी घेतल्यानंतर कॅन्टॉब मधून त्या शिकल्या. परंतु Soviat Academy of Social Sciences मध्ये एकाच भारतीयाचा, त्यांच्या त्या Philosophy of Economics मध्ये एकाच भारतीयाचा अंतर्भाव होता, त्या म्हणजे कांता रणदीवे. केवळ M.A. M.Sc. Phd. These are Important degrees but don't treat / read in between them, they themselves don't lead you any where. ज्ञान प्राप्त करणे ही एक जिज्ञासा असावी लागते.

आणि म्हणून प्राजक्ता आणि नचिकेत हे त्या आदर्श मार्गावर आहेत याचा मला अभिमान वाटतो. नचिकेतने जे गुण मिळवून यश संपादन केले आहे त्याबद्दल त्याचे आई वडिल यांना मी धन्यवाद देतो, खरं म्हणजे नचिकेतला आणखी एक धन्यवाद देतो की त्याने सांगितले की आईची शिकवण्याची पद्धत चांगली होती. म्हणजे त्याने आईला सर्टीफीकेट देऊन टाकले. म्हणजे इतका आत्मविश्वास त्याच्यामध्ये निर्माण झाला आहे याचे मला फार कौतुक वाटते. आणि इतका आत्मविश्वास असावा लागतो. खरं तर त्याचा मघाशी सत्कार होत असताना मला हायस्कूलमध्ये असताना मी १९६० ते १९६४ या चार वर्षामध्ये परळच्या नवभारत हायस्कूलमध्ये होतो, तेव्हाचे माझे दिवस आठवत होते. त्याच्यामध्ये आणि माझ्यामध्ये केवळ एकच फरक पण अत्यंत महत्वाचा फरक आहे की तो डोळ्या आड करून चालणार नाही की तो हुशार आहे आणि मी हुशार नव्हतो. पण otherwise मी जे काय ऐकलं की तो शिक्षकांच ऐकायचा वगैरे तसं मी ही ऐकायचो आणि ऐकलं ते बरं केलं असं मला वाटतं. ते त्याचंही आता मत आहे. त्याचा सत्कार होताना एका तऱ्हेने मी माझे पूर्वपुण्य देखील त्याच्या सत्कारात प्रतिनिधीत झालेले पहात होतो. मला आठवते की, १६ मार्च १९६४ रोजी S.S.C. ची परिक्षा सुरू झाली. आमच्या वेळची ११ वी आणि १५ मार्च रविवार होता. परिक्षेच्या आदल्या दिवशी रात्री १२.३० वाजता मी खांडेकरांची ययाती कादंबरी वाचून संपवली. मला असं वाटतं आपण किती मूर्ख, त्यावेळी होतो की उद्या सकाळी परीक्षा आणि मॅट्रीकमध्ये मराठी हा किती कठीण विषय; मराठी भाषा म्हणजे मातृभाषा म्हणून ती सोपी म्हणायचे कारण नाही, आपण तिच्याकडे दुर्लक्ष करतो. पण त्याची अनेक कारणं आहेत. तर मी जेव्हा गेलो तेव्हा मला साखं असं वाटत होतं की मला परीक्षेत निबंध काय येईल. सकाळी वर्गात जाऊन पेपर येईपर्यंत माझ्या डोक्यामध्ये ययाती असा का वागला? देवयानी असं का वागली? शर्मिष्ठेने असं का केलं? म्हणजे आणखी जर मी दोनदा वाचली असती तर मी परीक्षेला नापास झालो असतो.

प्रश्न असा की तुम्ही आयुष्याकडे कोणत्या दृष्टीने पहाता. ही गोष्ट मला आयुष्यामध्ये निर्णायक महत्वाची वाटते आणि त्याचा संदर्भ डॉ. बेडेकरांनी आदर्श शिक्षण मंडळाची स्थापना करण्यात आहे. मी जाहीरपणे डॉ. बेडेकर यांना शिक्षण महर्षी खऱ्या अर्थाने म्हणू इच्छितो. 'खऱ्या अर्थाने' हा शब्द जास्त महत्वाचा आहे. कारण शिक्षण महर्षी याचा संदर्भ गेल्या ५० वर्षात बदलून गेलेला आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी जेव्हा रयत शिक्षण संस्था काढली. त्यांच्या संस्थेच्या बोर्डिंगमध्ये एके दिवशी दुपारच्या वेळी विद्यार्थ्यांना जेवणासाठी तांदूळ नव्हते तेव्हा भाऊसाहेबांनी आपल्या बायकोच्या गळ्यातील मंगळसूत्र विकलं. शिक्षण महर्षींची ती परंपरा खऱ्या अर्थानं बेडेकरांसारख्या तपस्वींनी, जोशींसारख्या तपस्वींनी पुढे येऊन सांभाळली आणि म्हणून त्यांना अभिवादन करण्यासाठी मी या कार्यक्रमाला आलो. But that is not the only purpose for which I came. मला याबाबत असे वाटते की समाजातील आदर्श

धर्म हा ज्ञानावर अवलंबून नसतो.

फार वेगाने हासळत चालले आहेत. I am making you aware of what crisies is going on in the over all Indian social system. पु. ल. देशपांडे असं म्हणाले होते की आपण लोकांच्या पाया पडतो पण सगळ्याच लोकांच्या पाया पडत नाही. कारण काहींना पाय असतात बाकींना खूरं असतात. पु.लं.ची स्वत:ची बोलण्याची स्टाईल, त्यातला उपरोध, त्यातला विनोद बाजूला ठेवला तरी आज आपण अशा प्रकारच्या समाज व्यवस्थेमध्ये आहोत की ज्या ठिकाणी गेले ५०, ६०, ७० वर्षात विशेषत: स्वातंत्र्योत्तर काळामध्ये जी समाजव्यवस्था, जे आदर्श जी, मूल्ये आपल्यासमोर ठेवली; जी मूल्ये प्रत्यक्ष कृतीमध्ये आणण्यासाठी ज्या तपस्वींची गरज असते, ज्या ऋषींची गरज असते ते ऋषी, ते तपस्वी प्रचंड वेगाने कमी कमी होत चालले आहेत. आणि आजच्या व्यवस्थेमध्ये ज्या ठिकाणी प्रत्येक गोष्ट पैशामध्ये मोजली जाते अशा समाज व्यवस्थेमध्ये मूल्य, आदर्श हे जे आहेत ते टिकवून ठेवणे व नवीन निर्माण करणे ही गोष्ट वाटते तेवढी सोपी नाही.

शिक्षण क्षेत्राच्या संबंधामध्ये मी व्हाईस चान्सलर झालो म्हणून माझी मतं बदललेली नाहीत. मी मंत्र्यांनाही सांगितले आहे I am first Teacher. I am First Citizen & then Vice Chancellor. १६ मे २००० पूर्वी मी या देशाचा नागरिक होतो. आजही आहे. व्हाईस चान्सलर झाल्यामुळे माझ्या जबाबदारीत, माझ्या व्यक्तिमत्वात जी काय असेल ती भर पडली. माझ्या Qualification, नावाआधी आता मी व्हाईस चान्सलर लिहितो पूर्वी प्राध्यापक लिहीत असे. Nothing more than that. **मुळामध्येच या देशाचा नागरिक ही सगळ्यात मोठी पदवी समजत आलेलो आहे.** Citizen of India आणि म्हणून माझ्या दृष्टीने प्राध्यापक, शिक्षक, डॉक्टर, वकील, शैक्षणिक संस्थेचे पदाधिकारी या सगळ्यांचे मोजमाप मी एकाच फूटपट्टीने करतो आणि ते म्हणजे या देशाचा नागरिक Which is above everything Primeministership, Presidentship, for that matter of Vice Chancellorship. मला तुम्हाला सांगायचं आहे ते असं की ज्या समाजव्यवस्थेमध्ये आपण सगळे रहात आहोत ती व्यवस्था अत्यंत explosive होत चालली आहे. आपल्याला माहीत असेल एकंदर देशाच्या एडस् रूग्णांमधील ३० % रूग्ण एकट्या महाराष्ट्रात आहेत. ज्याला प्रलय म्हणतात त्या प्रलयाच्या काळावर आपण उभे आहोत. त्याची घंटा किंवा त्याची वॉर्निंग किंवा त्याचा इशारा याच्यापेक्षा मोठा असू शकत नाही. शिक्षणाच्या बाबतीमध्ये तेच. विद्यार्थी आणि शिक्षक यांचं रिलेशन तुमच्या कॉलेजमध्ये, काही निवडक कॉलेजमध्ये खूप चांगले आहे याचा मला अभिमान वाटतो. बांदोडकर कॉलेजच्या विषयी मी काय सर्टीफिकेट द्यायला पाहिजे? मी काय प्रशस्तिपत्रक दिलं पाहिजे? मी काय त्याच्यावर शेरा दिला पाहिजे? याच्यावर माझा विश्वास नाही. मी फक्त एवढच म्हणू इच्छितो, व्हाईस चान्सलर म्हणून कॉलेजच्या संदर्भामध्ये की, **ज्या विद्यापीठाला बांदोडकर सारखं कॉलेज जे Afficiate झालेलं आहे त्या विद्यापीठाचा मी व्हाईस चान्सलर आहे हे मला स्वत:ला गौरवास्पद वाटतं.**

मला स्वत:ला असं वाटत आलेलं आहे मी माझ्या आयुष्यामध्ये कोणत्याही प्रकारची तडजोड समोर बसलेल्या कोणत्याही माणसासाठी, कोणत्याही पदासाठी मी केलेली नाही. ती करण्याचं मला कोणतही प्रयोजन वाटत नाही. आपल्या समोर बसलेले किंवा आपल्या विरोधामध्ये असलेले सर्व लोक एका बाजूला जरी असले तरीसुद्धा माझी स्वत:ची अशी मानसिक धारणा आहे. माझ्या स्वत:च्या मनाची खात्री जर असेल तर मला त्याच्यामध्ये यत्किंचितही बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही. If I am convinced that I am wrong तर मात्र एक क्षणाचाही विलंब न लावता मी माझी चूक सुधारण्याचा प्रयत्न करतो. कारण स्वत:ची चूक समजल्यानंतर ती दृढ करण्याऐवजी सुधारत जाणं यामध्ये मानवी संस्कृतीचा खरा अन्वयार्थ दडलेला असं मी मानतो.

---

पहिल्यांदा मी ठाणा कॉलेज असे म्हणत असे. ठाणे कॉलेज किंवा बांदोडकर कॉलेज त्याच्या संबंधातली सगळी माहिती मला मिळालेली आहे. संबंध कॉलेजचं Brochure माझ्या घरी आहे. ते मी निवांतपणे आणि जेवढा मला वेळ मिळाला तेवढं मी वाचलेलं आहे. मला असं वाटतं की अशा प्रकारच्या थोड्याशा निराशामय अशा वातावरणामध्ये बांदोडकर कॉलेज, तिथले प्राध्यापक, तिथले विद्यार्थी, तिथलं संबंध वातावरण, मघाशी सुरुवातीला ज्या तऱ्हेने संगीताच्या स्वरांनी आमचं स्वागत झालं त्या वेळी मी, I forgot Economics. कारण संगीतावर स्वत: माझंही नितांत प्रेम आहे. M.A.ला असतांना सुद्धा परीक्षेला बसण्यापूर्वी मी जसं लग्न केले तसं मी तेव्हा हार्मोनियम शिकायलाही गेलो होतो. ते शिकलो नाही ते फार बरं केलं. सगळं Economics मी विसरलो असतो मी, इतकं माझं हार्मोनियमवर प्रेम आहे. माझ्या मते मला संगीतातील काही कळत नाही. पण ते एक असं वाद्य आहे It makes me forget of everything. म्हणजे पुष्कळ वाद्ये बाकीची आहेत, परंतु ती त्याच्या नंतर.

माझा आता जो परिचय करून दिला, तो परिचय, त्यातल्या सगळ्याच गोष्टी काही तुम्ही खऱ्या मानू नका, पण ज्या प्रकारच्या मराठीमध्ये माझा परिचय करून दिला गेला त्या मराठीचा मला अभिमान आहे. मराठी भाषेवर माझं नितांत प्रेम आहे. तेव्हा मी Economics घेतलं ते ठीक आहे पण जर ते नसतं घेतलं तर तत्वज्ञान विषय घेतला असता किंवा मराठी घेतला असता. ज्या तऱ्हेने त्या मॅडम बोलल्या, ज्या इंग्रजी गोष्टींचं ज्या तऱ्हेने त्यांनी ट्रान्सलेशन केले तेव्हा मला सारखं असं वाटत होते की मराठी भाषा केवढी मोठी आहे. वर हल्ली सिनेमा बघण्यासाठी सुद्धा अगदी रटाळ सिनेमा, मराठी सिनेमा बघणं. ३ तास म्हणजे केवढ दिव्य! ते त्याचं दिग्दर्शन, त्यातल्या त्यात कथा, त्यातल्या नणंदा भावजयांचा ४० वर्ष जुना वाद, सासुसुनांची भांडणं. एवढे प्रश्न महाराष्ट्रसमोर आहेत पण काय विशाद कुठल्याही प्रश्नाच ते दिग्दर्शन करतील. मी मिटींग बोलवतो. व्हाईस चान्सलर म्हणून सगळ्या प्रोड्यूसरची आणि मराठीमध्ये कुठले सिनेमे निघावे त्यांना सांगतो मी हे हे विषय त्यांच्यामध्ये घ्या म्हणून. पण तरी सुद्धा मराठी काही ऐकलं नाही बरेच दिवस. आता महाराष्ट्र टाईम्स वाचण्यापलीकडे मराठीचा काही संबंध येत नाही. मी तुम्हाला सांगतो प्रामाणिकपणे फार चुकल्या चुकल्यासारखं वाटतं Because Marathi Language is integral part of your whole existent. म्हणजे रक्ताच्या प्रत्येक थेंबाथेंबामध्येसुद्धा भाषा म्हणून मराठीचा अभिमान मला वाटतो. दुसऱ्या भाषांचा दुराभिमान नाही. पहिला शब्द आई म्हणून उच्चारण्याची जी भाषा त्या भाषेला आपण मातृभाषा असे म्हणतो आणि म्हणून तेव्हा या सगळ्या कार्यक्रमामध्ये जसं मी वेडेकरांना अभिवादन केलं जसं नचिकेत आणि प्राजक्ता यांचा सत्कार केला तशाच पद्धतीने आपल्या सगळ्यांचा सुद्धा आपण ज्या तऱ्हेने शांत बसणं, अर्धा तास मी येईपर्यंत वाट बघत बसणं, भारतीय व्यवस्थेमध्ये आज शक्य आहे? तुम्ही आज ज्या तऱ्हेने शांत बसलात इतकी शांतता लोकसभेमध्ये पार्लमेंटमध्ये असेल तर देशाची कुठल्या कुठे प्रगती होऊन जाईल!

परंतु एक गोष्ट आपल्याला सांगायला पाहिजे या सगळ्या गोष्टींचा प्रभाव नचिकेत आणि प्राजक्ता यांच्या व्यक्तिमत्त्वावर डेफीनेटली झालेला आहे. बाहेर जे काही राजकीय आर्थिक सामाजिक प्रश्न आहेत. देशाच्या समोर आर्थिक व्यवस्थेचा प्रश्न आहे. सामाजिक व्यवस्थेचा प्रश्न आहे. जातीयवादाचा प्रश्न आहे. अजूनसुद्धा या देशामध्ये मूठभर स्त्रिया, तुमच्या सारख्या सोडल्या, ज्या प्रथम रांगेमध्ये बसलेल्या आज ज्या प्राध्यापिका आहेत अशा मूठभर स्त्रिया समाजातल्या सोडल्या, ज्या त्यातल्या त्यात त्यांच्या वैचारिक, कौटुंबिक, सांस्कृतिक, पार्श्वभूमीमुळे थोड्याशा मुक्त झाल्या आहेत. थोड्याशा, Not totally. थोड्याशा मुक्त झाल्या. त्यांचा अपवाद जर केला तर जवळ जवळ अजून सुद्धा स्त्रियांचा प्रचंड महासागर अन्यायामध्ये

---

आपल्याला लोखंडी स्नायू आणि पोलादाचे मज्जातंतू हवे आहेत.

शोषणामध्ये अजून जशाचा तसा आहे. ५० वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरसुद्धा आपल्याकडचे पुरुष बायकांना अजूनही मारतात. Its absolutely unethical for any cultural society मी तुम्हाला एक सांगतो. मी आयुष्यात जे काही शिकलो ते ४ थी पासून ७ वी पर्यंत, आणि उरलेली ८ वी पासून मॅट्रीकपर्यंत शाळेत सुद्धा. आपण जसा सत्कार केला तसा माझासुद्धा सत्कार झाला होता माझ्या हायस्कूलमध्ये. आणि मी त्यांना सांगितलं खऱ्या अर्थाने मी जे काही शिकलो ते १८ वर्षांपर्यंत शिकलो. पुढे मी काहीही शिकलो नाही. बर्नार्ड शॉ एकदा आपल्या मित्राच्या घरी गेला आणि बर्नार्ड शॉ तुम्हाला माहित्येय किती उद्दाम, किती विनोदी, किती उपरोध. भारतात ज्यावेळी बर्नार्ड शॉला विचारलं, तुम्ही गांधींना भेटणार आहात का? तेव्हा तो म्हणाला, Who is Gandhi? तेव्हा गांधी एवढा मोठा माणूस तेव्हा बर्नार्ड शॉ म्हणाला, One great man doesn't see another great man. म्हणजे बर्नार्ड शॉमध्ये उपरोधपणा एवढा होता की he himself स्वयंभू? एकदा मित्राकडे गेला त्याला असं विचारलं हा तुझा मुलगा का? हो हा माझा मुलगा. काय शिकतो? तो म्हणाला अजून शाळेत नाही गेला. किती वय? ५ वर्ष वय आहे. तो ५ वर्षांपर्यंत काही शिकलेला नाही? आयुष्यात पुढे तो काहीही शिकणार नाही. मी तुम्हाला खऱ्या अर्थाने असं सांगतो की जे काही शिकायचं असतं ते आपण नकळत शिकत जातो. शाळेमध्ये, वर्गामध्ये आपण अभ्यास शिकतो. त्यातील शिकण्याची प्रक्रिया जी असते ही कुठे भाजीबाजारामध्ये गेल्यानंतर, कुठे बस स्टॉपवर, कुठे मार्केटमध्ये.

सर्व सामान्य माणसांकडून मला असं जाणवत आलेलं आहे की समाज ही फार मोठी लॅबरोटरी आहे. Real Laboratories not are in colleges. Real Laboratory is not Universities. Real Laboratory is not Pathological Chemical Lab of any Universities. सबंध समाज आपण लोकांशी बोलतो कसे, वागतो कसे, लोकांशी काय संबंध येतो. आपल्या घरातील कचरा स्वच्छ करण्यासाठी आपल्या घरातील २ किलो कचरा आपण लोकांच्या घरात टाकतो का? तिथे आपलं खरं शिक्षण आहे. मला असं वाटतं की बांदोडकर कॉलेज ज्या युनिव्हर्सिटीमध्ये आहे ज्या समाजामध्ये आहे तिथले प्राध्यापक, तिथले शिक्षक, तिथले विद्यार्थी या सगळ्यांची एकंदर तिथले भावनिक, त्यांची बौद्धिक, त्यांची सांस्कृतिक, पार्श्वभूमी लक्षात घेता या देशाचं भविष्य अजूनही उज्वल आहे. आपल्या सगळ्यांचे हातभार त्याला लागतील. आपले विद्यार्थी, आपले पालक, आपले सगळे सहकारी, त्यांचा आदर्श आहे. मी त्यांना तर मी मगाशी असं म्हणालो, मी तुम्हाला भेटण्यासाठी आलो. I mean. कारण मी पाहिलं असं आहे की हे बेडेकरांसारखे जे लोक आहेत हे लोक म्हणजे समाजामध्ये प्रयोग करणारे ऋषी आहेत. They are not only founders, they are ऋषी. आईनस्टाईन ऋषी होऊन गेला. मार्क्स, गांधी, आंबेडकर ऋषी होऊन गेले. याचे कारण त्यांनी खऱ्या अर्थाने समाजाला जाणलं. बाईंना नचिकेत जेव्हा पहिला आल्यानंतर जो आनंद झाला तो आनंद पुनर्निमितीचा. Not only निर्मिती, पुनर्निर्मिती. Production & Reproduction इथे संपूर्ण. जेव्हा एडिसनने पहिल्यांदा लाईट पाहिला असेल, तुम्हाला वाटतं काय वाटलं असेल त्याला? कुठली भाषा इंग्रजी, हिंदी, मराठी; There is no language to express what Edison realised when he saw First Ray of Electricity.

हे सगळे लोक खऱ्या अर्थाने समाज पुढे घेऊन जातात. बेडेकर त्यातले एक ऋषी मी समजतो. या विद्यार्थ्यांचं पुन्हा एकदा अभिनंदन करतो. तुम्हाला सगळ्यांना एकदा धन्यवाद देतो आणि पुन्हा एकदा बेडेकरांना अभिवादन करून माझं भाषण संपवतो. **जयहिंद !**

टीप : सदर भाषण टेपवरून ऐकून लिहून काढण्याचे काम दीपाली भाटकर यांनी केले आहे.

***

# पहिलीपासून इंग्रजी शिक्षण

निशिता शिरीष कुलकर्णी

*नवीन पिढीतील विद्यार्थ्यांचे वक्तृत्व समजावे या दृष्टीने येथे हे भाषण देत आहोत. ठाण्यातील प्रसिद्ध अशा* ***कै. नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेच्या*** *यंदाच्या कनिष्ठ महाविद्यालय गटात या भाषणास प्रथम क्रमांक मिळाला होता. - संपादक*

परिक्षक महोदय, गुरूजन आणि माझ्या मित्र-मैत्रिणींनो, नमस्कार !

'भारतीय संस्कृतीचा अभिमान बाळगा', 'भारतीय संस्कृती जतन करा', 'तिला लोप पावू देऊ नका', असे आवाज आज जिकडून तिकडून ऐकायला येत आहेत. का? का? अशी स्थिती आपल्या देशावर आज का यावी? ही ही टी.व्ही.सारखी माध्यमं पाश्चिमात्य संस्कृती आपल्या देशावर लादू पहात आहेत आणि आजची ही नवी पिढी पाश्चिमात्य संस्कृतीच्या आहारी जाऊन भारतीय संस्कृतीला मुकू लागली आहेत. आणि याला जबाबदार दुसरं कोणीही नसून आपण स्वत: आहोत, हे आपण मान्य केलंच पाहिजे. अहो, एकेकाळी 'आई आई ये इकडे माझे म्हणणे ऐक गडे' असं म्हणणारी मुलं आज 'जॅक ॲण्ड जील वेंट अप द हिल' म्हणत पाश्चिमात्य संस्कृतीच्या विळख्यात गुंडाळली जात आहेत. पण, पण या प्रश्नाला सडेतोड उत्तर आम्ही शोधून काढलं आणि ते म्हणजे 'पहिलीपासून इंग्रजी शिक्षण !'

आता काही विचारवंतांना माझे हे विचार पटणार नाहीत पण मी काय सांगते आहे ते नीट ऐका. मी स्वत: मराठी माध्यमातून शिकले. लहानपणापासून माझ्यावर मराठीतूनच संस्कार होत गेले. आणि केवळ म्हणूनच एक आदर्श विद्यार्थिनी म्हणून शालेय जीवनातून महाविद्यालयीन जीवनात मी पाऊल टाकलं. पण मी जसजशी मोठी होत गेले तसतशा माझ्या जगाबद्दलच्या जाणिवा रुंदावल्या. मला वेगवेगळे अनुभव येत गेले. आणि माझ्यात एक न्यूनगंडाची भावना निर्माण होत गेली की आपल्याला जगाशी नीट संपर्क साधता येत नाही. चारचौघात ताठ मानेने वावरता येत नाही. का? का तर माझं इंग्रजी कच्चं होतं. आणि ही जाणीव मला झाल्यानंतर मी स्वत: मराठीची पुरस्कर्ती असूनसुद्धा माझ्या धाकट्या भावाला हट्टाने इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालायला लावलं. तो शाळेत जायला लागला आणि दोनचार वर्षातच सरकारने 'पहिलीपासून इंग्रजी शिक्षण' ही योजना अमलात आणली. त्या वेळी मला फार हळहळ वाटली. कारण, कारण काय ते नीट लक्षात घ्या हं. 'पहिलीपासून इंग्रजी शिक्षण' याचा अर्थ मुलांना सर्व विषय हे मराठीतूनच शिकवले जातील. पण, पण त्या शिवाय अधिक असे इंग्रजीचे ज्ञानही त्याचवेळी मुलांना दिले जाईल. माझ्या दृष्टीने हा अगदी योग्य निर्णय आहे.

आता, कदाचित तथाकथित बुद्धीमंतांना तो अयोग्य वाटेल. पण त्यांचं ते म्हणणं चुकीचे आहे असं माझं ठाम मत आहे. अहो! तुम्ही लाख म्हणाल हो, मुलांच्या बुद्धीवर ताण येतो, त्यांचा मेंदू थकतो, मराठी भाषा लोप पावते. हे हे सारं सारं खोटं आहे. कारण, माझ्या वाचनाप्रमाणे किंवा माझ्या माहितीप्रमाणे मूल जन्माला आल्यापासून ते त्याच्या वयाच्या ८-१० वर्षापर्यंत त्याची भाषाग्रहणशक्ती इतकी प्रचंड असते. कारण निसर्गनियमानुसार ते वय हे भाषा शिकण्याचंच असतं. त्यामुळे कोणतीही भाषा चटकन आत्मसात करतं आणि एकावेळी अनेक भाषा शिकू शकतं.

---

ज्या देशात अगर समाजात स्त्री गौण मानली जाते, तो देश किंवा समाज कधीच उन्नती करू शकणार नाही.

अहो, साधं व्यवहारज्ञान आहे. आपण शहरात राहतो. वेगवेगळ्या प्रांतातले लोक तेथे एकत्र येऊन राहतात. मग एखाद्या गुजराती माणसांच्या शेजारी ख्रिश्चन माणूस किंवा मराठी माणसांच्या शेजारी आणखी कोणी परभाषिक राहतो. आता माझ्याच शेजारी बघा. एक आहेत गुजराती, एक आहेत ख्रिश्चन तर एक आहेत मद्रासी पण त्यांची मुलं स्वत:ची मातृभाषा तर उत्तम प्रकारे बोलू शकतातच पण त्याचप्रमाणे इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये जातात म्हणून इंग्रजी, मराठमोळ्या वातावरणात वावरतात म्हणून मराठी. आणि आमचा वॉचमन आहे भैया म्हणून त्याच्याशी हिंदी या सगळ्या भाषा इतक्या छान बोलतो की परक्या माणसाच्या लक्षातही येणार नाही की, याची मातृभाषा नक्की कोणती. आणि हा माझा सिद्धांत नसून आजच्या या आधुनिक शास्त्रज्ञांचा आहे.

आणि स्वत:ला मराठीचे पुरस्कर्ते म्हणवणारे स्वत: किती मराठीचा आदर करतात हो? अहो, विनोबा भावे म्हणतात, 'स्वरूप पहा विश्वरूप पाहू नका' जगाला ब्रम्हज्ञान सांगण्यापेक्षा आपल्या घरात, परिसरात काय घडतंय, ते उघड्या डोळ्यांनी पहा. त्यांची मुलं -नातवंडच त्या कॉन्वेंट शाळांमध्ये काय जातात. फाडफाड इंग्लिश काय बोलतात. जीन्स-मिनीज घालून फिरायला काय जातात. त्यांना आपल्या वडिलांचा साधा मराठीतला लेख वाचता येत असेल तर शपथ, एवढं त्यांचं मराठीबद्दलचं ज्ञान अगाध आहे. आणि म्हणे आम्ही मराठीचे पुरस्कर्ते ! वा ! वा ! छान हं !

मराठी ही आपली मातृभाषा आहे. आहे नं यात काही प्रश्नच नाही. पण आजच्या घडीला इंग्रजी ही जगाची मातृभाषा आहे, हे कटु सत्य आपण मान्य केलंच पाहिजे. अहो, तथाकथित विचारवंतांनो, जरा विचार करा. तुमचं चौथीपर्यंतचं शिक्षण जरी मराठीतून झालं असलं तरी पुढचं शिक्षण हे इंग्रजीतूनच झालयं हो. कारण त्यावेळी मराठीतून पुस्तकंच उपलब्ध नव्हती. आणि मित्रांनो, त्याही पुढे जाऊन मी तुम्हाला सांगेन की आजच्या ज्या अजरामर कलाकृती आहेत की ज्या ती फुलराणी असो किंवा नटसम्राट असो किंवा व. पुं. च्या कथा असोत किंवा मतकरींच्या गूढकथा असोत, या साऱ्यांची प्रेरणा ही इंग्रजी साहित्यातील कलाकृतींवरच आधारित आहेत आणि हे त्या लेखकांनी खुल्या मनाने मान्य केलं आहे. म्हणून मी त्यांचा उल्लेख येथे करते आहे. जर या लेखकांनी इंग्रजी साहित्याचा आस्वाद घेतला नसता तर अशा या अजरामर कलाकृती आपल्या मराठी साहित्यात निर्माण झाल्या असत्या का? जरा विचार करा. आज इंग्रजीला 'वर्ल्ड लँगवेज' म्हटलं जातं. इंग्रजी भाषेतील शैक्षणिक कार्यक्रम एवढे उत्तम असतात की ते प्रत्येक विद्यार्थ्यांने पहावेत. आणि मराठी भाषेतील शैक्षणिक कार्यक्रम काय दर्जाचे असतात ते आपण जाणूनच आहात. कारण गेल्या दोन पिढ्या सुशिक्षित आणि सुखवस्तू घरातील बहुतेक मुलं इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतात. त्यामुळे त्यांचा मराठीशी संपर्क तुटतो आणि आज तीच मुलं हे असे मराठीतील शैक्षणिक कार्यक्रम राबवतात. तेव्हा परक्या भाषेवर बोट ठेवण्यापेक्षा मराठी कार्यक्रमाचा दर्जा आपण वाढवला पाहिजे. आज कॉम्प्युटर, इंटरनेटच्या सहाय्याने ज्ञानाचा ओघ घरोघरी वाहतोय. पण, पण तो फक्त इंग्रजीतूनच. आणि त्या ज्ञानाचा फायदा आपल्याला घ्यायचा असेल तर तिला आपलसं केलं पाहिजे. तिला आत्मसात केलं पाहिजे. आणि हे होईल तेव्हाच, जेव्हा पहिलीपासून इंग्रजी शिक्षण सुरू केलं जाईल.

मग आपोआपच ती मुलं भारतीय संस्कृती जतन करत 'येरे येरे पावसा तुला देतो पैसा' असं म्हणत असतानाच 'रेन रेन गो अवे कम अनदर डे' असं म्हणतील. शेक्सपिअर वाचताना त्यांना ज्ञानोबा भेटतील, तुकोबा भेटतील. पु.लं.चा आधार त्यांना लाभेल. आणि हीच मुलं खऱ्या अर्थाने मराठीला जगवतील. तिला इतिहासजमा होण्यापासून वाचवतील. आणि मग खऱ्या अर्थाने मराठीला

---

प्रत्येक जीव हा परिस्थितीला जखडलेला गुलाम असतो.

जीवनदान दिल्यासारखं होईल. आजपर्यंत प्रगतिपथावर ताटकळत राहिलेली ती मराठी माध्यमातील मुलं सुद्धा ताठ मानेने जगाच्या पाठीवर वावरतील.

तेव्हा हे तथाकथित बुद्धीमंतांनो माझी तुम्हाला हात जोडून कळकळीची विनंती आहे की, मराठी भाषेत इंग्रजीचे आगमन अडवण्याचे पाप स्वत:च्या शिरी मारून घेऊ नका. स्वत:ची प्रतिष्ठा धुळीस मिळवू नका. आणि असं तुम्ही कराल, तरच तुम्ही खऱ्या अर्थाने मराठीचे पुरस्कर्ते म्हणून ओळखले जाल.

मित्रहो, तथाकथित साहेब, प्रतिसाहेब, दादा, भाऊ, भाई, जे जे कोणी आपल्याला मराठीचे पुरस्कर्ते आणि इंग्रजीचे विरोधक वाटतात ते ते सारे ढोंगी, राजकारणी, मराठीचे प्रचारक आपल्या मुलानातवंडांना स्कॉटिश स्कूल, सिंघानिया स्कूल यांसारख्या शाळांमध्ये काय पाठवतात. अमेरिकेतल्या आपल्या पुतण्या-भाच्यांना आपले वारसदार काय करतात. त्या विचारवंतांनी मराठी भाषिक उमलत्या बालकांना इंग्रजीपासून वंचित ठेवण्याचा 'विचारवंत' या बुरख्याखाली जो प्रयत्न चालवला आहे तो हाणून पाडणे हा खरा महाराष्ट्र धर्म ठरेल. तेव्हा मित्रांनो, आपल्याला जरी इंग्रजीचे द्वार योग्य वयात उघडले नाही तरी ते आपल्या चिमुकल्या भावंडांना आणि भावी पिढीला उघडले जावे हेच खरे महाराष्ट्रहित ठरेल.

धन्यवाद!

**निशिता शिरीष कुलकर्णी,**
मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स,
सरोजिनी नायडू मार्ग,
मुलुंड (पश्चिम),
मुंबई - ४०० ०८०.

***

(पान क्र. ११ वरून)

**माहिती तंत्रज्ञान प्रदर्शन - मा. प्रमोद महाजनांचे भाषण**

our history Indian Passports is looked upon with a respect on any International Airport only because of IT & nothing else. तुमची जर कल्पना असेल की क्लिंटन आणि पुत्री भारतीय फूड खायला इथे आले; नाही! एका वर्षात हिंदुस्थानमध्ये सर्व महाशक्ती येऊन गेल्या. काल टोनी ब्लेअरला वाटलं आपल्याला उशीर झाला म्हणून म्हणाला मी सुद्धा उत्सुक आहे. एकच कारण आहे आपलं, IT. म्हणून The whole image of nation is changed out side मी परवा पॅरिसमध्ये गेलो, त्यांना सांगितलं, Forget. This is not the old India, which you read about naked sadhus on the street. No. This is not a India where you saw a cows on the street till you may see some cows on the street but today we have more dot com on the street than the cows. It is a mouse user India. It's a changed India. It's a 21st Century India. आणि मला वाटतं ही जी ताकत इंडियात आलेली ती या आपल्या "Millenium IT Exhibition" ने अजून एक पाऊल पुढे टाकायला मिळेल अशी अपेक्षा करतो. याचं उद्घाटन झालं असं जाहीर करतो आणि मी बोलायला उभा राहिल्यानंतर पूर्ण ५० मिनिटे झालेली असल्यामुळे हा माझा तास इथच संपवतो.

***

टीप : सदर भाषण टेपवरून ऐकून लिहून काढण्याचे काम दीपाली भाटकर यांनी केले आहे.

# वृद्धाश्रम

कु. अमृता बा. नेने

*कै. नी. गो. पंडितराव वक्तृत्व स्पर्धेच्या यंदाच्या कनिष्ठ महाविद्यालय गटात दुसरा क्रमांक प्राप्त भाषण देत आहोत. 'पहिलीपासून इंग्रजी शिक्षण' हा गेल्या वर्षातला महत्त्वाचा चर्चेचा विषय होता, तर 'वृद्धाश्रम' हा नेहमीच चिंतनीय विषय आहे. या विषयाबाबत नवीन पिढीची ही मते. - संपादक*

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. किंबहुना आजच्या काळातील 'दंतकथाच' म्हटली पाहिजे. असं म्हणतात की, श्रावण बाळ आपल्या अंध आई-वडिलांना काशीयात्रा घडावी म्हणून त्यांना कावड करून खांद्यावर घेऊन गेला होता. सध्या 'कावड' नाही पण अत्यंत वेगवान व सुलभ अशी वाहने वृद्धांसाठी उपलब्ध आहेत, जी त्यांना सुखरूपपणे काशीयात्रेला नाही तर 'वृद्धांच्या मक्केत' 'वृद्धाश्रमात' नेऊन पोहोचवतात. अनाथाश्रम, महिलाश्रम तसा वृद्धाश्रम ! पूर्वी जीवनाचे स्वीकारलेले चार आश्रम होते ज्यात जीवन सर्वार्थाने अर्पण केले जाई आणि आता आश्रम जीवनाला अर्पण किंबहुना दान केले आहे. बाकी वृद्धाश्रमात आणि अनाथाश्रमात फारसा फरक नाही. फरक इतकाच अनाथाश्रमात मुलांना आईवडिल सोडतात तर वृद्धाश्रमात मुलं आईवडिलांना सोडतात, बाकी व्यथा तीच!

पाश्चिमात्यांचे विशेषत: अमेरिकेचे अंधानुकरण करण्याचा सपाटा लावलेल्या आम्ही 'वृद्धाश्रम' सुद्धा तिथूनच आयात केलेला आहे. अन्यथा तो मुळी आपल्या जीवनाचा गाभाच नव्हे. हं ! पण गेल्या काही दशकांत अफाट आसमंतात भराऱ्या मारू पाहणाऱ्या पिलांना आपल्या मार्गात उपदेशपर, मार्गदर्शकपर, सहाय्यभूत होऊ पहाणारे शांत निरामय झोत बादळी बनू लागले आणि आपला मार्ग बदलण्यापेक्षा त्या झोतांनाच त्यांनी आपल्यापासून दूर वळविण्याचा निर्णय घेतला आणि 'वृद्धाश्रम' नावाच्या एका घनदाट अरण्यात 'त्या' झोतांना त्यांनी नेऊन सोडले. पण पिल्लं विसरली की, भौगोलिक परिस्थिती सगळीकडे सारखीच नसते. 'अमेरिका नामक भूप्रदेशात 'ते' झोत 'ज्येष्ठ नागरिक' म्हणून मान्यता पावतात आणि मानाने आयुष्य जगतात. समाधान असतं की नाही हे विचारायचं नाही. पण 'भारत' नावाच्या भूप्रदेशात झोत नुसतेच झोत राहतात. त्यांना 'ज्येष्ठत्व' प्राप्तच होत नाही. समाधान फार दूरची गोष्ट आहे. पण तरीही ते आपल्या घरट्यात पिलांना उब देण्यातच समाधानी आणि आनंदी असतात.

आमच्याकडे 'वृद्धाश्रम' रुपी जंगलात सुद्धा इतर अनेक बाबींप्रमाणे एकवाक्यता ही नसतेच. 'पाऊस' जितका पाडाल तितकी जंगलं फळाफुलांनी समृद्ध आणि सुखकारक असतात-झोतांसाठी. 'पाऊस' नसेल तर बाकीच्या झोतांना 'कनिष्ठ वृद्धाश्रम-जंगलात' जावे लागते. किंवा रस्त्यांवर आधाराची अपेक्षा करत दीनवाणेपणे फिरत बसावे लागते. वृद्धाश्रमं कितीही समृद्ध, सुखसोयींनी युक्त असली तरी ती शेवटी 'परकी' असतात. आपलं लहानसं का होईना पण हकाचं मायेचं असलेलं घर आणि अशा घरातली माणसं कशीही वागली तरी 'आपली'च असतात. त्यांची सर मोल करून मिळवलेल्या प्रेमाला येत नाही. त्यामुळेच एखाद्या गोपाळरावांना त्यांच्या नातीचं किंवा एखाद्या शांताकांना त्यांच्या मुलीनं पत्र पाठवलं कि बाकीच्या सगळ्यांना जणू आपल्यालाच पत्र पाठवलेलं आहे या आनंदाने भारावून जातात. परत परत त्या पत्रांची पारायणं करतात. जुन्या आठवणींना, दिवसांना उजाळा देतात. आपापल्या मुलांच्या, त्यांच्या सुखी आयुष्याच्या धाग्यांत गुंतुन जातात. ज्यांना मुलं नसतात ते इतरांच्या सुख-दु:खाचे वाटेकरी होऊन राहतात. हो ! वृद्धाश्रमात अपत्ये नसलेली, कोणीतरी आयुष्याच्या उतरणीस बघावे म्हणून काही माणसे तेथे येतातच की ! हं ! म्हणजे वृद्धाश्रम केवळ जबरदस्तीने पाठवलेल्या झोतांचाच नाही तर स्वच्छेने तिथे वळलेल्या

झोतांचाही असतोच तर.

पण मग बाकीच्यांना तिथे का पाठवावं लागतं? स्वत:चे घर असतानाही 'पाहुणं' बनून का रहावं लागतं? प्रश्न जितके सोपे तितकेच उत्तरं मात्र अधिक गुंतागुंतीची होत जातात.

'एकोऽहम् असाह्य कृशोऽहम् अपरिच्छद
स्वप्नेऽप्येवंविधा चिन्ता मृगेन्द्रस्य न जायते।'

तद्वतच आयुष्यात आपण कधी एकटे पडू असे या वृद्धांच्या स्वप्नात सुद्धा येत नाही. त्यामुळेच आपल्या परिवारात स्वत:ला अधिक गुंतवून घेतात. परंतु त्यांचा हा सहभाग कधी कधी तरुण पिढीला त्रासदायक ठरतो. प्रत्येक गोष्टीत सहभागी होण्याचा, ती जाणून घेण्याचा त्यांचा अट्टाहास, आपल्याच मतावर अडून राहण्याचा हेकेखोरपणा, नवीन पिढीच्या जीवनात नवनवीन समस्या उभ्या करतो, परिणामी त्यांना अन्यत्र ठेवण्याचा निर्णय घेतला जातो. तर कधी कधी त्यांचे नुसते 'अस्तित्व' सुद्धा नकोसे होते आणि वृद्धांची रवानगी शेवटी वृद्धाश्रमात होते. किंबहुना काही वेळा तर आपल्या मुलांच्या आयुष्यात आपली अडचण नको, तसेच सांसारिक जंजाळातून सुटका व्हावी व आयुष्याची अखेर तरी स्वत:च्या मर्जीनुसार जगता यावी म्हणून काही जण स्वत:च वृद्धाश्रमाचा मार्ग पत्करतात.

बहुरंगी छटा असलेलं 'जीवनाच्या उतरणीचं' हे एक वैचित्र्यपूर्ण 'नाणं' आहे. या छटा निर्माण होतात त्याच मुळी विचारसरणीतील फरकामुळे, ज्याला सध्याच्या भाषेत 'जनरेशन गॅप' म्हणतात. विचारसरणीतील फरकाला सुरुवात होते तीच मुळी आयुष्याच्या तत्वज्ञानापासून ! जीवनात जपण्यासारखं असतं काय? हे तत्व धरून आम्ही मार्गक्रमणा करतो. तर जीवनात जपण्यासारखं काहीतरी असून हे तत्व धरून ते मार्गक्रमणा करीत असतात. पण मग हे भिन्न मतप्रवाह 'वृद्धाश्रम' या एकाच थांब्यापाशी एकत्र येऊ शकतात का? तर नाही.

प्रभु रामचंद्र, श्रावणबाळ, पुंडलीक अशा मातापिता परायण पुत्रांचा संस्कृती असलेला आपला देश आहे. केवळ संस्कृती म्हणून नाही, कर्तव्य म्हणून नाही, तर ज्या आईवडिलांनी जन्मभर खस्ता खाऊन आपल्याला वाढवलं, आपल्या सुख-दु:खांना आपलं मानलं, त्यांच्या त्या प्रेमाला, आपण पात्र आहोत हे दाखवण्याकरता 'वृद्धाश्रम' ही संकल्पना खोडून काढली पाहिजे. जरा उलट दिशेने विचार केला तर आपणही एकेकाळी लहान होतो. हट्टी, दुराग्रही होतो. स्वत:च्या मतांवर अडून राहणारे होतो. पण म्हणून आईवडिलांनी आपल्याला 'बालकाश्रमात' आणून ठेवले नाही. कधी रागाने तर कधी प्रेमाने आपल्याला समजावून आपल्या विचारांशी ते एकरूप झाले. 'म्हातारपण' हे सुद्धा दुसरं 'बालपण'च आहे. फक्त त्यावेळी भूमिका उलट्या होतात. आपली भूमिका अधिक जबाबदारीची होते. त्यांच्या 'लहानपणी' समजून घेतलं पाहिजे. पाडगावकरांनी म्हटलंच आहे,

'आयुष्यात काय केवळ काटेरी डंखच आहेत?
डोळे उघडून पहा तरी, प्रत्येकाला फुलपाखराचे पंख आहेत.'

हे फुलपाखराचे पंख आपल्याला आपल्या आईवडिलांच्या मायेच्या कुशीत गवसणारे आहेत. पण याचा अर्थ असा नव्हे की, आपल्यानंतर नातवंडात त्यांना अडकवून ठेवणे. ते स्वत: जरी इच्छुक असले तरी त्यांना त्यापासून दूर ठेवून एक तणावविरहित, आश्वासक, चैतन्यपूर्ण जीवन जगू दिले पाहिजे जसे आपण लहानपणी अनुभवलेले आहे. त्यासाठी 'वृद्धाश्रम' नव्हे तर समवयस्कांसाठी 'वृद्धानंद मेळावा'चा नव्या संकल्पनेचा पायंडा आपण घातला पाहिजे. आणि तो इथून तेथे 'निर्यात' झाला पाहिजे.

आईवडिलांच्या अथक परिश्रमातून साकार झालेले आपले आयुष्य आहे. त्यांच्या जीवनाला काही आपण आकार देऊ शकत नाही पण आनंद तर देऊ शकतो, कारण 'प्रेमाच्या या गाण्यासाठी प्रेमाचा हा छंद, जगणे म्हणजे उधळीत जाणे हृदयातील आनंद'.

**कु. अमृता बा. नेने**
रामनिवास, रुईया कनिष्ठ महाविद्यालय, (विज्ञान शाखा)
माटुंगा, मुंबई -१९.

***

---

माणसांना विचार करू द्या. माणूस विचार करू शकतो हे त्याचे वैभव आहे.

# शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती कशी निर्माण करावी व जोपासावी

कु. मेधा हेमंत खरे

*यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय शास्त्रातील निष्णात परीक्षेसाठी नागपूर येथे एक निवासी शिबीर झाले. त्या शिबीरात एका विद्यार्थिनीने सादर केलेला हा अभ्यासनिबंध. शिक्षक-पालकांनी लहान विद्यार्थ्यांत वाचन संस्कृति निर्माण केली पाहिजे या दृष्टीने हा निबंध 'दिशा'च्या वाचकांसाठी देत आहोत. - संपादक*

बालवर्गांमध्ये आजही अरेबियन नाईट्स्, फास्टर फेणे, गोट्या, पंचतंत्र आणि इसापनिती कथा-संग्रह लोकप्रिय आहेत. ह्या कथा मुलांना आवडतात परंतु अडचण ही आहे की, त्यांची ओळख मुलांना योग्य रीतीने करून दिली जात नाही. विपुल अशी वाचन संपदा उपलब्ध असताना देखील तिची ओळख आजकाल मुलांना करून दिली जात नाहीत. विविध कारणांमुळे आज विद्यार्थ्यांचे वाचन ही गोष्ट फक्त अपवादात्मकच आढळते आणि अशावेळी प्रश्न सामोरा येतो तो शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती कशी निर्माण करावी व जोपासावी.

शालेय विद्यार्थी ह्या वयोगटातील मुले संस्कारक्षम मनाची असतात. १० ते ५ शाळेत जाणे, शाळा सुटल्यावर घरी येणे, शाळेत दिलेला गृहपाठ, प्रश्नोत्तरे लिहिणे व त्यावर आधारित परीक्षा देणे म्हणजे शिक्षण नव्हे. परंतु दुर्दैवाने आपल्या देशात हाच समज रुजला आहे व दृढ झाला आहे. शालेय शिक्षणाच्या उद्दिष्टांचा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

**शालेय शिक्षणाची उद्दिष्ट्ये :**

१) लहान मुलांमध्ये शिक्षण प्रक्रियेची आवड निर्माण करून त्यांना एक किंवा अधिक भाषांचे प्राथमिक ज्ञान मिळवून देणे, त्याचबरोबर अन्य काही विषयांचा परिचय करून देणे हे काम प्राथमिक शाळेच्या चार वर्षांच्या अभ्यासक्रमातून केले जाते. या अभ्यासक्रमामुळे बाल विद्यार्थ्यांची पुढील शिक्षणाची पायाभूत अशी पूर्वतयारी होत असते. या तयारी नंतर विद्यार्थी पुढील शालेय शिक्षण घेऊ शकतो किंवा व्यावसायिक शिक्षण प्रशिक्षणाकडे वळू शकतो.

२) मुलांना किंवा विद्यार्थ्यांना ते ज्या समाजात राहतात व इतरांशी सातत्याने आंतरक्रिया करीत वाढत असतात, त्या समाजाची आणि आसपासच्या परिसराची ओळख करून देणे.

३) मुलांना नैतिक मूल्यांचा परिचय करून देऊन आदर्श नागरिक म्हणून त्यांची जडणघडण करणे, ज्यायोगे ती जीवनात विधायक दृष्टिकोन ठेवून भावी काळात समाज व देश विकासाला साहाय्यभूत होतील.

शिक्षणाचा मुख्य उद्देश भावविकास आणि मनोविकास आहे. भावविकास आणि मनोविकास जेव्हा होतो तेव्हा व्यक्तींचा, समाजाचा आणि पर्यायाने देशाचा उत्कर्ष होतो. विद्यार्थ्यांच्या मनाला योग्य वळण लावून हवं तसं वळवता येतं. हे सर्व साध्य करण्यासाठी त्यांना वाचनाची सवय लावणे महत्त्वाचे आहे. या ठिकाणी बेंजामिन फ्रँकलिनचं वाक्य मला उध्दृत करणं इष्ट वाटतं. तो म्हणत असे, 'No man can be truely educated of successful in life unless he is a reader of book.'

**आजचे प्रतिकूल वातावरण :**

आज आपल्याला असे दृश्य दिसते की, सर्वत्र वाचनाची आवड कमी झाली आहे. एवढेच नव्हे तर मुलांचं वाचनच बंद झालं आहे. त्याला अनेक कारणं आहेत.

१) क्रमिक पुस्तकांचा विद्यार्थ्यांवर होणारा भडिमार. मुलांना प्रादेशिक भाषा, राष्ट्रभाषा आणि स्पर्धेत टिकायला हवे म्हणून इंग्रजी अशा तीन भाषा शिकणं अनिवार्य आहे.

२) अगदी केजी पासून दहावी पर्यंतच्या मुलांना एकतर शाळेत जाण्यापूर्वी वा शाळेतून आल्या आल्या शिकवणीला जावं लागतं.

३) आपण सर्वत्र पाहतो की, सध्या एकत्र कुटुंबपद्धती लयास जात आहे. त्यामुळे मुलांना घरात संस्कार करणारे आजी-आजोबांसारखे मोठे माणूस कोणीही नसते. आईवडील दोघेही नोकरीव्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर असतात व मुले पाळणाघरात असतात. ह्यामुळे परिपूर्ण संवाद घडून येत नाही.

४) सगळीकडे सध्याच्या काळात दूरदर्शन आणि केबल च्या विविध वाहिन्यांवरील कार्यक्रमांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

५) घटक चाचण्यांचा नको तेवढा बाऊ करणे, त्यामुळे अवांतर वाचन करायला वेळच मिळत नाही.

६) 'हम दो हमारे दो' झाल्याने आपल्या एक वा दोन मुलांमुळे त्याला एखाद्या गोष्टीवरलचं अंग असो वा नसो, एकतर क्रिकेट, टेबल टेनीस सारखे खेळ वा पोहणे, एखादं संगीत वाद्य मुलांना आलंच पाहिजे असा पालकांचा अट्टाहास ह्यामुळे मुलांना वाचनाला वेळच मिळत नाही.

७) अशा अनेक कारणांमुळे वाचन कमी झालं आहे. हे पालक, विद्यार्थी आणि पर्यायाने देशाला अपायकारक आहे.

**ग्रंथ हेच गुरू :**

ग्रंथ हेच गुरू आहेत ह्या उक्तीच्या अनुषंगाने मला येथे काही विचारवंतांची वचने उद्धृत करावीशी वाटतात, जसे,

१) जगातील अनेक व्यक्तींनी जी बौद्धिक उंची गाठली आहे तिचे मूळ ग्रंथ वाचनात आहे. चॅनिंगने म्हटले आहे, 'बौद्धिक उंची गाठण्याचा राजरस्ता म्हणजे वाचन.' ज्यांना त्यातलं कळतं त्याला ग्रंथ म्हणजे ज्ञानाची खाणच होय. गत काळातील थोर आत्म्यांची नि:श्वसने म्हणजे ग्रंथ. नुसतीच शालेय क्रमिक पुस्तके वाचून बौद्धिक उंची गाठता येणं शक्यच नाही. आजच्या युगात बौद्धिक उंची गाठण्यासाठी वाचनासारखा साधा आणि सोपा दुसरा उपाय सापडणार नाही.

२) कार्लाईल म्हणतो, 'जर बारकाईने विचार केला तर शालेय अथवा महाविद्यालयीन शिक्षणापैकी आपलं खरं शिक्षण सुरू होतं ते ग्रंथांच्या सहवासात. ग्रंथ हेच खरे विद्यापीठ.'

३) दासबोध, मनाचे श्लोक असे मनाला वळण लावण्याचे साहित्य निर्माण करणारे रामदास स्वामींनी देखील लिहून ठेवलय, 'दिसामाजी काहीतरी ते लिहावे। प्रसंगी अखंडित वाचित जावे॥'

अशी ही सगळी थोर वचने वाचनाचे महत्त्व आपल्याला सांगतात. खरोखरच, आपली ज्ञानलालसा भागविणारे ग्रंथ हे आपले गुरूच होत.

**वाचनाची आवड शालेय जीवनातच कशी लावता येईल :**

१) आज मूल अडीच वर्षाचं झालं की, आई वावांना पाळणाघर किंवा के. जी. मध्ये टाकण्याची घाई होते. तेथे त्याला फक्त डांबलं जातं आणि त्यामुळे बौद्धिक विकास

---

आपण आपल्याबरोबर सर्वांना मोक्षाचा आनंद मिळेल असं पाहिलं पाहिजे.

होणं शक्यच नाही. त्याबरोबरच घरीच त्यांना बडबडगीत, प्राणी, पक्षी, फुले इ. चित्रांच्या पुस्तकांची ओळख करून द्यावी. ह्या वयापासूनच मग त्यांची हत्ती, सिंह, पोपट, बगळा, मांजर ह्यांची चित्रांमार्फत प्राण्यांची ओळख होते. 'लहान माझी बाहुली तिची मोठी सावली', 'छान छान छान मनीमाऊच बाळ कसं गोरं गोरं पान' ह्या बडबडगीतांशी दोस्ती होते.

२) आई-वडीलांनी, आजोबा-आजींनी शालेय शिक्षणाबरोबरच मुलांना रामायण, महाभारताच्या आपल्या इतिहासातील वीर पुरुषांच्या कथा सांगून त्याचं व्यक्तिमत्त्व कसं विकसित होईल याचा प्रयत्न करावा. एकदा कथा ऐकली की मुलं मूळ पुस्तक अवश्य वाचतीलच.

३) घटक चाचण्यांना सध्याच्या परिक्षा पद्धतीत महत्त्व आहे पण त्याचा उगाच बाऊ करू नये. मुलानं नियमितपणे अवांतर वाचन आवश्यक असल्याचं पटवून द्यावं व तो तसे करतो की नाही, याकडे लक्ष ठेवावं.

४) मुलांना नित्य वाचनासाठी पुस्तकं घेऊन द्यावीत. मुलांना त्यांचे वाढदिवस, निकाल लागल्यावर अभिनंदन करतांना किंवा मुंजीच्या वेळी भेट म्हणून पुस्तकेच द्यावीत. यामुळे वाचन संस्कृतीची जोपासना हमखासपणे होईल आणि ही भेट चिरंतन राहील.

५) आपल्या मुलाला प्रत्येक क्षेत्रात अडकवून ठेऊ नये. त्याच्या मनाचा कल, बौद्धिक क्षमता याचा अंदाज घेऊन फक्त एकाच क्षेत्रात जाऊ द्यावे, बाकीची क्षेत्रं तो आपोआपच वाचनाच्या साहाय्याने निश्चित पार करू शकेल.

पाल्याचा सर्वांगीण विकास होण्यासाठी वाचनाच दालन त्यांनी विद्यार्थ्यांना उघडून द्यावं. चांगले साहित्य वाचण्याची मुलांमध्ये आवड निर्माण झाली की, ती कमी होत नाहीच तर दिवसेंदिवस वाढतच जाते.

**शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती कशी निर्माण करावी :**

शालेय विद्यार्थ्यांच्या वयाचा विचार करता त्या वयाच्या मुलांची आकलन शक्ती कोणतीही गोष्ट चटकन आत्मसात करून घेण्याची असते. अशा वयातच त्यांना वाचनासारख्या चांगल्या गोष्टींची सवय लावली, आवड निर्माण केली तर पुढे आयुष्यभर ही सवय जोपासली जाते. म्हणूनच त्यांच्यात ह्या वाचन साहित्याची आवड निर्माण करून त्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन करून आपण त्यांना याची रुची वाढविण्यात मदत करू शकतो.

**१) स्वयं अभ्यास प्रवृत्ती वाढविणे** - शाळेतील अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विविध विषयांवर वाचन करून स्वतःचे ज्ञान संपादन करण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये वाढविणे हे सर्वांत महत्त्वाचे काम ग्रंथपालाचे आहे. या दृष्टीने ग्रंथालयाने वेळोवेळी निरनिराळ्या प्रकारचे साहित्यिक स्वरूपाचे उपक्रम राबवून जसे, वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, नाट्यवाचन स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा ह्यामुळे विद्यार्थ्यांना विविध विषयांवरील पुस्तकांचे वाचन करण्यासाठी प्रवृत्त करणे. बक्षिसे व प्रमाणपत्रांच्या आकर्षणाने विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेतात व वाचनाकडे आकर्षित होतात. त्यातूनच त्यांना स्वतः अभ्यास करून ज्ञानार्जन करण्याची सवय लागते. शिवाय वक्तृत्व स्पर्धा, कथाकथन स्पर्धा इ. मुळे त्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी निश्चितच मदत होते.

**२) पुरवणी वाचन उपलब्ध करून देणे** - क्रमिक पुस्तकांत असलेल्या, वर्गात शिकविल्या जाणाऱ्या विषयांवरल अधिक जास्त प्रमाणात विद्यार्थ्यांना माहिती आवश्यक असते अशावेळी अशी माहिती ग्रंथालयातच जाऊन तो विद्यार्थी मिळवू शकतो. अशावेळी ग्रंथालयांचे ह्यातील महत्त्वाचे कार्य म्हणजे शिक्षकांनी शिकविलेल्या विषयाला अनुसरून असलेले साहित्य ग्रंथालयामध्ये उपलब्ध असल्यास, कोणता नेमका मजकूर व माहिती त्या

विद्यार्थ्यांसाठी आवश्यक आहे हे समजावून सांगणे. त्यामुळे त्यांना वाचनांत गोडी निर्माण होईल.

**३) माहिती व ज्ञान कसे मिळवावे हे शिकविणे -** आपल्याला ज्या माहितीची आवश्यकता आहे ती माहिती कोणत्या ग्रंथांत उपलब्ध आहे, त्यातून ही माहिती कशी शोधावी यासाठी सुद्धा शालेय ग्रंथालयांनी तत्पर असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे भावी काळात त्या विद्यार्थ्यांना स्वत:ला आवड निर्माण होऊन ते अशी माहिती शोधण्याच्या कामात स्वावलंबी होतील. त्यामुळे त्यांना त्यांच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या विषयाची जास्तीत जास्त माहिती मिळाल्याने त्यांना चांगल्या वाचनसाहित्याची आवड निर्माण होईल. उदा. शब्दकोश, ज्ञानकोश असे संदर्भ ग्रंथ याशिवाय नकाशे इ. च्या माध्यमांतून ही माहिती शोधण्यासाठी विद्यार्थी कायम तत्पर राहतील.

**४) पुस्तक पेढी योजना राबविणे -** शाळांमधून शिकणाऱ्या आर्थिक दृष्ट्या गरीब विद्यार्थ्यांना शालेय ग्रंथालयांमधून पुस्तकांचे संच अभ्यासासाठी घरी देण्यात यावेत. त्यामुळे गरीब विद्यार्थ्यांमधील जीवनातील शैक्षणिक विकासातील अडचण दूर होऊन त्या विद्यार्थ्यांच्या वाचनाच्या कक्षा रुंदावण्यात ग्रंथालयांचा मोठा सहभाग राहील.

**५) वर्ग वाचनालय चालविणे -** ग्रंथालयाचा फायदा शालेय ग्रंथालयातील प्रत्येक विद्यार्थ्याला मिळावा. त्यामुळे ग्रंथालयांमार्फत वर्गवाचनालय चालविण्यात आल्याने त्या त्या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या आकलन शक्तीनुसार त्यांना स्वत: पुस्तके निवडून दिल्यानंतर त्यांच्या दृष्टीने चांगले वाचनसाहित्य कोणते? कोणत्या विद्यार्थ्याला कसे वाचनसाहित्य हवे आहे? ह्याकडे लक्ष पुरविता येईल.

**६) करमणुकीच्या कार्यक्रमांचे आयोजन करणे -** विद्यार्थ्यांना सतत क्रमिक पुस्तके वा क्रमिक पुस्तकांसंदर्भातील ग्रंथ वाचून कंटाळा येतो. त्यामुळे त्यांना क्रमिक पुस्तकांव्यतिरिक्त, मनोरंजनपर असे साहित्य म्हणजे कथा, कविता, विनोदी चुटके, चरित्रे, एकांकिका असे काहीतरी वाचावयास आवडते, किंबहुना ती त्यांची गरजच असते. त्यासाठी ग्रंथालयाने असे साहित्य त्यांना उपलब्ध करून दिले पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यांच्या मनात ग्रंथ व ग्रंथालयाबद्दल प्रेम व आवड निर्माण होते.

**७) रिकाम्या वेळेत वाचनाची सोय उपलब्ध करून देणे -** शिक्षक रजेवर असतील किंवा इतर कारणाने विद्यार्थ्यांस रिकामा वेळ मिळाल्यास त्या काळात त्याला वाचनाची पुस्तके देऊन त्याच्या ज्ञानात भर टाकणे किंवा त्याचे मनोरंजन करणे या दृष्टीने विचार करता, ग्रंथपालाने रोज सकाळी जे शिक्षक रजेवर असतील त्यांची नावे घेऊन, ज्या वर्गावर त्यांचे तास असतील त्या वर्गातील विद्यार्थ्यांना त्यांच्या बुद्धीला झेपेल व आवडेल अशा विषयांवरील, भाषेमधील ग्रंथसुविधा पुरवावी.

**८) विद्यार्थ्यांमधील चांगल्या सवयी व छंद यांची जोपासना व विकास करणे -** विद्यार्थ्यांमध्ये ज्या चांगल्या सवयी असतील किंवा त्याला जे छंद असतील, त्यांचा विकास ग्रंथालयामार्फत करावयाचा असतो. एखाद्या विद्यार्थ्यास क्रिकेटची आवड असेल तर त्याला क्रिकेट किंवा क्रिकेटीयरविषयी ग्रंथ वाचण्यास देऊन किंवा एखाद्यास गिर्यारोहणाची आवड असेल तर त्याला त्याबाबतचे ग्रंथ देणे किंवा एखादी चित्रफीत दाखविणे असे कार्य ग्रंथालयाने केले तर विद्यार्थ्यांचे असलेले छंद जोपासले जाऊन त्यांना त्याबाबत जास्तीत जास्त ज्ञान मिळते. वाचनाची गोडी लागते.

**९) संदर्भ सेवा पुरविणे -** विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या स्पर्धांच्या वेळी किंवा परीक्षेच्या कालावधीत संदर्भ सेवेची विशेष आवश्यकता असते. समजा महात्मा गांधी या विषयावर निबंध वा भाषण तयार करतांना त्यांचा जन्म,

शिक्षण, त्यांची कौटुंबिक माहिती, त्यांचे कार्य इ. बाबतची माहिती विद्यार्थ्यांला शोधायाची असते किंवा परीक्षेच्या काळात तो नेमका इ. स. वगैरे विसरतो. अशावेळी त्याला आवश्यक असलेली माहिती चटकन् उपलब्ध करून देण्याचे महत्त्वाचे कार्य ग्रंथालयाने, म्हणजेच पर्यायाने ग्रंथपालाने केले पाहिजे.

१०) **नियतकालिकांचे महत्त्व पटवून देणे -** दैनंदिन जीवनामध्ये व अभ्यासक्रमामध्ये नियतकालिकांचे काय स्थान आहे? नियतकालिकांत कशा प्रकारची माहिती प्रकाशित होते व कोणत्या नियतकालिकांत कोणती माहिती मिळू शकते? याबाबतची सर्वसाधारण तोंडओळख ग्रंथपालांनी विद्यार्थ्यांना करून देणे आवश्यक आहे. जगामध्ये नव्याने येणारे ज्ञान ग्रंथापेक्षाही नियतकालिकांमध्ये प्रथम प्रकाशित होते, याची जाणीव विद्यार्थ्यांना त्यांच्या शालेय जीवनातच करून देणे अनिवार्य असते.

**शहरी भाग आणि ग्रामीण भाग :**

शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती निर्माण करण्याच्या दृष्टीने दोन विभागांतील विद्यार्थ्यांचा प्रामुख्याने विचार करावा लागेल. ह्या विद्यार्थ्यांचे वर्गीकरण हे दोन गटांतील केले जाईल, १) शहरी भाग, २) ग्रामीण भाग.

**शहरी भाग -** शहरी भागांत मुलांना शैक्षणिक सोयी सवलती उपलब्ध असतात. त्यातही विद्यार्थी दोन भागांत विभागले जातात. एक म्हणजे उच्चभ्रू वस्तीतील विद्यार्थी, दुसरे म्हणजे झोपडपट्टीनजिक राहणारे विद्यार्थी.

उच्चभ्रूंच्या शाळेत ग्रंथालये असतात परंतु **ग्रंथपालाला शाळेतील अन्य कामे सक्तीने करावी लागत असल्याने ग्रंथालये दुर्लक्षित आहेत.** दरवर्षी ग्रंथ खरेदी होतेच असे नाही. ग्रंथपाल सुद्धा मुलांना आवडणारी पुस्तकं कोणती हे छातीठोकपणे सांगू शकत नाही. मग पुस्तके विकत घेण्याची तसदी घेत नाही. परंतु काही शाळांमध्ये विशेषत: मराठी माध्यमाच्या शाळेत फक्त साने गुरूजींची पुस्तके वर्षानुवर्षे खरेदी करतात. इंग्रजी माध्यमांच्या शाळेत मात्र हार्डीबॉईज, नॅन्सीड्रयूची पुस्तकं खरेदी केली की आपलं काम झालं अशी दारुण अवस्था आहे.

झोपडपट्टीतील मुलांच्या वाचनाची आवड कुणालाच ठाऊक नाही. या शाळेमध्ये ज्याप्रमाणे स्पोर्टसचं सामान नाही त्याचप्रमाणे ग्रंथालयांत पुस्तकं नाहीत. मुलं शाळेत येतात हेच आश्चर्य आहे. या मुलांसाठी पुस्तकांची गोडी निर्माण करणं अत्यंत आवश्यक आहे. त्यांना रामायण महाभारतातील गोष्टी अगदी सोप्या भाषेत खुलवून सांगाव्या लागतात. विशेषत: पोळा, दसरा, दिवाळी, होळी अशा सणांच्या निमित्ताने आपल्या संस्कृती संबंधीची माहिती देणारी पुस्तके ठेवली आणि ती मधील माहिती थोडक्यात दिली वा वाचून दाखविली तर मुलांना वाचनाची गोडी लागते.

**ग्रामीण भाग -** ग्रामिण विभागात अजूनही एक शिक्षकी किंवा दोन शिक्षकी शाळा आढळतात. शिक्षकांना शाळेतील व्यवस्थापनापासून शिकवण्यापर्यंत सगळीच कामे करावी लागतात. अनुदान, पैशांची चणचण एकूण सभोवतालची सामाजिक परिस्थिती नेहमी भेडसावत असतात. अशा परिस्थितीत ग्रंथालय, वाचन ह्या गोष्टी प्रत्यक्षात येणं अशक्यच असते.

नागपूरच्या सीताबर्डी वरील राजाराम वाचनालय याबाबतीत एक अभिनव कार्यक्रम काही वर्षांपासून चालवीत आहेत. वाचनालयाचे कार्यकर्ते जवळ जवळ १००० पुस्तके विशेषत: बालविभागाची पुस्तके घेऊन जवळपासच्या खेड्यात जायचे, तेथे बालसाहित्याचे प्रदर्शन भरवायचे, खेड्यापाड्यातील मुलांना रंगीबेरंगी पुस्तके कधीच बघायला न मिळाल्यामुळे ती मुलं सकाळी दहा वाजता जी पुस्तकं घेऊन वाचायला बसायची ती तिन्हीसांजा

---

शास्त्रातील गहन प्रश्नांची चर्चा करा, त्याच वेळी मळाच्या आवारात तयार झालेलं धान्य बाजारात नेऊन विकण्यासाठी सिद्ध असा.

होईपर्यंत. यामुळं शालेय जीवनांतच मुलांना वाचनाची सवय लागली.

प्रत्येक विभागातील विद्यार्थ्यांपर्यंत ज्ञानगंगा ही पोहोचविली गेली पाहिजे. त्यासाठी मुलांमध्ये मिसळणं आवश्यक आहे. शालेय अवस्थेतील मुलांची मनं संस्कारक्षम असतात त्यामुळे त्यांना ह्या कालावधीतच वाचनाची सवय लावली पाहिजे.

ह्या अभ्यासनिबंधाच्या अनुषंगाने मला एक पुस्तक हाताळायला मिळालं त्यातील एक शालेय विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून असलेला विचार थोडक्यात उध्दृत करणे मला इष्ट वाटते.

थोर विचारवंत महर्षी टॉलस्टॉय दररोज सायंकाळी मुलांना ग्रंथालयांत घेऊन जात असे. ग्रंथांच्या अनुषंगाने ते प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम करत असत. त्यातून मुख्यत: जीवनोपयोगी नैतिक व धार्मिक शिक्षण द्यायचे. हे सारं प्रश्नोत्तराच्या रूपानं चालत असे आणि मुलं (स्टार प्लसच्या करोडपतीप्रमाणे) त्यांत रंगून जात. यातूनच Teaching of christ explained to childern हे पुस्तक तयार झालं. इतकी वर्षे झाली तरी हे पुस्तक अजून लोकप्रिय आहे.

आपल्याकडे कै. साने गुरूजी देखील मुलांमध्ये असेच मिसळत असत. शाळेतील धडे पाठ करणे, शिक्षकांनी लिहून दिलेली उत्तरे उत्तर पत्रिकेत लिहीणे आणि उत्तीर्ण होणे म्हणजे शिक्षण नव्हे असं त्यांचं ठाम मत होतं. जीवन फुलविणाऱ्या, खुलविणाऱ्या व आनंदमय करणाऱ्या साऱ्या प्रवृत्ती आणि कला यांनाही मानवी जीवनात महत्त्व आहे अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. लोककथांवर त्यांनी संस्कार केले, गोड गोष्टी लिहिल्या, 'श्यामची आई' ही अजरामर कादंबरी लिहिली. सुंदर पत्रे लिहिली. ती वाचून एक संस्कारक्षम पिढी तयार झाली. आजही साने गुरूजींची पुस्तके वाचनालयांत जागेवर नसतात. विद्यार्थ्यांना वाचनाची सवय त्यांनी लावली आणि जोपासली.

**विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी सूचित केलेले उपक्रम :**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती निर्माण केली की, साहजिकच त्यांचे लेखनकौशल्य सुधारण्यास मदत होते व त्याचा शैक्षणिक गुणवत्तेवर निश्चितच परिणाम होतो. म्हणूनच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाभिरूची, वाचन कौशल्य निर्माण करण्यासाठी ग्रंथालयांनी निश्चितच प्रयत्न करायला हवेत व त्यादृष्टीने ह्या अंतर्गत काही उपक्रम सुद्धा राबविणे महत्त्वाचे आहे. अशी वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी अनेक उपक्रम चालविण्यात येतात त्यातील काही उपक्रम खालीलप्रमाणे -

१) **ग्रंथ वेष्टने आकर्षक रीतीने प्रदर्शित करणे -** ग्रंथलयांत नव्याने खरेदी करण्यात आलेल्या ग्रंथांची माहिती विद्यार्थ्यांना पुरविणे हे महत्त्वाचे काम. ही माहिती विद्यार्थ्यांना पुरविण्याच्या दृष्टीने नवीन ग्रंथांची वेष्टने मध्यवर्ती सूचनाफलकावर, की जो सर्वच विद्यार्थी पाहतात अशा ठिकाणी, नव्या ग्रंथांची वेष्टने आकर्षक रितीने लावली तर नियमितपणे ग्रंथालयात न येणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील ते ग्रंथ पाहण्यासाठी ग्रंथालयात यावेसे वाटेल. उदा. भा. रा. भागवतांचे फास्टर फेणे हे पुस्तक ग्रंथालयांत आले की, त्याचे वेष्टन काढून ते सूचनाफलकावर लावले व त्याच्याच खाली पुस्तकातील ५-६ आकर्षक वाक्ये लिहिली तर विद्यार्थ्यांच्या मनांत साहजिकच त्या पुस्तकाबद्दल उत्सुकता जागृत होईल व नेहमी ग्रंथालयांत न येणारा विद्यार्थी सुद्धा ते पुस्तक पाहण्यासाठी का होईना, ग्रंथालयात येईल व त्यातूनच पुढे त्याला वाचनाची आवड व पर्यायाने ग्रंथालयाचे आकर्षण निर्माण होईल.

२) **विशेष दिवसांची माहिती -** शाळा वर्षभरात विशेष दिवस साजरे करते. त्या दिवसांची वैशिष्ट्ये

---

जगाचं नव्हे, एका व्यक्तीचं दु:ख जरी मला थोडसं कमी करता येणं शक्य असेल,
तरी मी हजार वेळा जन्म घेण्यास तयार आहे.

सांगणारे, माहिती देणारे साहित्य ग्रंथालयांत उपलब्ध करून दिले तर स्वाभाविकच त्या साहित्याचा चांगला वापर होतो.

३) **ग्रंथ प्रदर्शन** - शाळेत अनेक सांस्कृतिक कार्यक्रम साजरे केले जातात. वेगवेगळ्या पुण्यतिथ्या, जयंत्या, सण, उत्सव, स्नेहसंमेलन इ. अशावेळी त्या कार्यक्रमाला अनुसरून ग्रंथ प्रदर्शन आयोजित केल्यास विद्यार्थ्यांना ग्रंथांची माहिती होते व सहज ग्रंथ चाळण्यासाठी म्हणून ते ग्रंथ हाताळतात व त्यातूनच वाचनाची आवड निर्माण होते. उदा. गांधी जयंतीच्यावेळी गांधीजींच्या जीवनावरील व त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांचे प्रदर्शन ठेवावे किंवा १५ ऑगस्टला देशप्रेमावरील कथांच्या पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करावे की जेणे करून विद्यार्थी ग्रंथ हाताळेल. ग्रंथ हाताळणे ही वाचनाची गोडी लावण्याचे बालामृत आहे हे लक्षात ठेवावे.

४) **भित्तीपत्रके, मासिके** - शाळेमध्ये नियमितपणे भित्तीपत्रकांचा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना ग्रंथालयाकडे आकर्षित करून घेता येते. वेगवेगळे विषय विद्यार्थ्यांना देऊन त्यावर निबंध, कथा, विनोदी चुटके, कविता, माहितींचे संकलन तयार करण्यास सांगावे व त्यांना भित्तीपत्रिकेमध्ये विद्यार्थ्यांच्या नावासह प्रसिद्धी द्यावी. यासाठी त्यांना ग्रंथालयांतून कथा कशा लिहाव्यात, आपले मत आकर्षक रितीने कमीत कमी शब्दांत कसे मांडावे, वेगवेगळी माहिती कशाप्रकारे संकलित करावी याबाबतचे ग्रंथ पुरवावेतच शिवाय त्याची उत्तम उदाहरणे म्हणून, तशा प्रकारच्या कथा-कविता माहिती असलेले ग्रंथ त्यांना उपलब्ध करून द्यावेत. त्यांच्या नावाला या उपक्रमाद्वारे प्रसिद्धी मिळणार असल्यामुळे अर्थातच त्या विद्यार्थ्यांना असे काम करण्यास उत्साह वाटतो व त्यासाठी ते ग्रंथांचा वापर करण्यास उद्युक्त होतात. यातूनच त्यांची वाचनाची आवड वाढते.

५) **ग्रंथालय तास** - ग्रंथालय तास ग्रंथपालाने वर्गात जाऊन विद्यार्थ्यांना ग्रंथालयात नवीन आलेल्या ग्रंथांचा परिचय करून द्यावा. त्यामुळे त्यांच्या मनात वाचनाची प्रेरणा निर्माण होईल.

६) **निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन** - निबंध लेखन हा विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाचा एक भाग आहे. खरे तर निबंध लेखनाचे प्रयोजन विद्यार्थ्यांमध्ये वाचन आणि लेखन प्रवृत्ती निर्माण करणे हे असते म्हणून शिक्षक आणि ग्रंथपालांनी निबंध लेखनासाठी कोणत्या ग्रंथांचे वाचन करावे हे विद्यार्थ्यांना सुचवावे.

७) **प्रश्नमंजुषा** - सामान्य ज्ञान विषयक माहिती बरोबरच इतर सर्व विषयांवरील माहितीचा समावेश असलेली प्रश्नमंजुषा विद्यार्थ्यांसाठी आयोजित करावी. जेणे करून ते ह्या प्रश्नमंजुषेत भाग घेण्यासाठी स्वत: निरनिराळ्या कात्रणांचा, नियतकालिकांचा, पुस्तकांचा व दृकश्राव्य साधनांचा वापर करतील.

८) **ग्रंथप्रेमी मंडळांची स्थापना** - शालेय विद्यार्थ्यांमध्ये कॅप्टन होणे हे एक मोठे व महत्त्वाचे पद मानले जाते. आपणही कॅप्टन झाले पाहिजे असे शालेय जीवनात प्रत्येकालाच वाटत असते, ह्याचा उपयोग ग्रंथप्रेमी मंडळाची स्थापना करून सुद्धा होऊ शकतो. ह्यात चांगल्या, विद्यार्थी उपयोगी शूर वीरांच्या कथा, तंत्रज्ञान, विज्ञान ह्या संबंधी पुस्तकांचा समावेश करून त्यात विद्यार्थ्यांनाच पुढाकार घेण्यास भाग पाडले तर ते विद्यार्थ्यांना निश्चितच आवडेल. ह्यात काही विद्यार्थ्यांना त्या त्या विभागांचे प्रमुख करून त्यांच्यावर जबाबदारी टाकावी म्हणजे प्रत्येकालाच आपण सुद्धा ह्यात सहभाग घ्यावासा वाटेल.

९) **मुक्तद्वार पद्धती** - शालेय विद्यार्थी जेव्हा ग्रंथालयांचा वापर करू लागतात तेव्हा त्यांना त्या वयात ग्रंथांबद्दल फारशी माहिती नसते. अशावेळी त्यांना प्रत्यक्ष ग्रंथकक्षातील कपाटांजवळ जाऊन ग्रंथ हाताळण्याची संधी

दिली तर त्यांना आपल्या ग्रंथालयात किती आणि कोणते ग्रंथ आहेत याची जाणीव होते. शाळेतील विद्यार्थ्यांनी ग्रंथालयांतील ग्रंथांचा अधिकाधिक वापर करावा म्हणून त्यांना ग्रंथसंग्रहाचा मुक्तपणे वापर करण्याची संधी द्यायला हवी. विद्यार्थ्यांना ग्रंथसंग्रहाचा वापर मुक्तपणे करता आला नाही, तर त्यांच्यामध्ये वाचनाची आवडच निर्माण होणार नाही. प्रवेश बंद पद्धतीत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ग्रंथ हाताळता येत नसल्यामुळे त्यांना ग्रंथांच्या स्वरुपासंबंधी पुरेशी कल्पना येत नाही. शिवाय तालिका पाहून ग्रंथ मिळेपर्यंत त्यांचा वेळ वाया जातो आणि विद्यार्थी निरुत्साही होतात. म्हणून मुक्तद्वार पद्धतीचा अवलंब करावा. ह्यामुळे विद्यार्थ्यांना आपल्या ग्रंथालयांत अनेक विषयांवर विविध प्रकारची माहिती देणारे ग्रंथ आहेत याची जाणीव होते. त्यांना प्रत्यक्ष स्वत:ला ग्रंथांपर्यंत पोहोचता येते. त्यामुळे ग्रंथांचा अधिकाधिक वापर होण्याच्या दृष्टीने ही एक आदर्श पद्धती आहे. डॉ. रंगनाथन यांच्या पंचसूत्रीतील 'ग्रंथ वापरासाठी आहेत', 'प्रत्येक वाचकाला त्याचा ग्रंथ मिळालाच पाहिजे', 'प्रत्येक ग्रंथाला त्याचा वाचक मिळालाच पाहिजे' आणि 'वाचकांचा वेळ वाचवा' या चारही सूत्रांची परिपूर्ती ग्रंथालयांत ह्या पद्धतीमुळेच शक्य होते.

१०) **प्रकल्प तयार करण्यास सांगणे** - विद्यार्थ्यांना विविध विषयांवर कात्रणांचे संग्रह तयार करण्यास सांगावे. जेणेकरून या उपक्रमामुळे विविध विषयांवर वाचन करून त्या आधारे त्या विषयाला अनुसरून असणारे प्रकल्प तयार करतील.

अशा विविध उपक्रमांबरोबर रोज सुविचार, बातम्या वार्ताफलकावर लिहाव्यात, कथाकथन स्पर्धा आयोजित कराव्यात. तसेच शाळेतील 'वार्षिक हस्तलिखित' काढण्याच्या दृष्टीने त्यांना मार्गदर्शन करावे. अशाप्रकारे विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी वरील उपक्रमांचा अवलंब करण्यात यावा.

**शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती जोपासण्याच्या दृष्टीने काही संस्था कार्यरत आहेत त्या संस्थांचा थोडक्यात उल्लेख :**

मुलांमध्ये वाचनसंस्कृती निर्माण करण्यासाठी आणि जोपासण्यासाठी निरनिराळ्या संस्था कार्य करत आहेत. त्या संस्थांचा उल्लेख करणे हे ह्या अभ्यासनिबंधाच्या दृष्टीने मला अत्यंत महत्त्वाचे वाटते आणि त्यादृष्टीने अजूनही काही संस्था ह्या प्रयत्नात आहेत.

**राजाराम सीताराम दीक्षित वाचनालय, सीताबर्डी, नागपूर :**

नागपूरातील सार्वजनिक वाचनालयाच्या कक्षेत मोडणाऱ्या राजाराम वाचनालयाने १९७५ च्या सुमारास नवीन पिढीवर वाचनाची सवय लागावी व ती जोपासावी या दृष्टीने काही उपक्रम राबविण्यास सुरुवात केली ते उपक्रम खालीलप्रमाणे :-

१) **बालसाहित्य संमेलन** - २००० मध्ये राजारामच्या बाल साहित्य संमेलनाचा रौप्य महोत्सव होईल. बालकांमध्ये वाचनाची, लिखाणाची आवड निर्माण करण्यासाठी चालू केलेले प्रयत्न पूर्णपणे सफल झाले आहेत. या संमेलनातून लेखक, लेखिका, अभिनेते, अभिनेत्या, वक्तृत्व स्पर्धेचे फड जिंकणारे तरुण-तरुणी निर्माण झाले आहेत. बाल झुंबड आणि बाल साहित्य दिंडी लोकप्रिय आहेतच.

२) **आंतरशालेय गीतगायन स्पर्धा** - 'वंदे मातरम्' या गीताच्या शताब्दीच्या निमित्ताने १९७५ सालापासून ही स्पर्धा सुरू केली आहे. बालकांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना जोपासण्यासाठी चालू केलेल्या या स्पर्धेने अनेक शालेय विद्यार्थ्यांबरोबरच सर्वांच्या दृष्टीने सुद्धा ही स्पर्धा अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याची गीतं

चांगल्याप्रकारे माहिती झाली व आजही २५ वर्षांपासून ही स्पर्धा अत्यंत यशस्वीपणे सुरू आहे.

३) **हस्ताक्षर आणि चित्रकला स्पर्धा** - मुलांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी या स्पर्धा चालू केल्या. गेली १५ वर्षे या स्पर्धांना प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. दोन्ही स्पर्धांमध्ये साहित्य आणि संस्कृतीचे जतन करण्याचा दृष्टीकोन आहे. रामायण, महाभारत मालिका चालू असतांना सारा भारत दूरदर्शन पुढे बसला असतांना राजाराम वाचनालयात मुले त्यातील चित्रं काढत असत. विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुधारावे, त्यांना परीक्षेत सुंदर हस्ताक्षरामुळे अधिक गुण मिळावे, रामायण, महाभारत, बायबल सारख्या आणि सावरकर, कुसुमाग्रज यांचे ओजस्वी विचार मुलांपुढे जावे या उद्देशाने चालू केलेल्या स्पर्धा ग्रामीण क्षेत्रातही लोकप्रिय ठरल्या आहेत. या शतकाचे साहित्यिक कै. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचारधन लाखो विद्यार्थ्यांपुढे नेण्याचे कार्य सातत्याने गेली जवळ जवळ १५ वर्षे ह्या वाचनालयाने चालविले आहे.

४) **ग्रंथ प्रदर्शने** - नामवंत साहित्यिकांच्या जयंती, पुण्यतिथी आणि अमृत महोत्सवी वर्ष इ. कार्यक्रमांच्या निमित्ताने प्रदर्शन आयोजित करण्यात येतात. क्रिकेट, टेनिस आणि ऑलेंपिक खेळांसंबंधी तसेच साने गुरूजी, स्वातंत्र्यवीर सावरकर, ग. दि. माडगूळकर यांच्यावरील साहित्य विद्यार्थ्यांना बघायला मिळावे ह्या दृष्टीने सुद्धा हे वाचनालय प्रयत्न करीत आहे.

५) **फिरती बाल वाचनालये** - वाचनालयात बाल तसेच महिलांचे कार्यक्रम वर्षभर चालू असतात. निरनिराळ्या वस्त्यांमध्ये बाल वाचनालये उघडण्याचे वाचनालयाचे प्रयत्न आहेत. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या क्रमिक पुस्तकांच्या व्यतिरिक्त इतर पुस्तकांचे सुद्धा ज्ञान होते.

अशा प्रकारे अनेक सार्वजनिक वाचनालयांपैकी महाराष्ट्र राज्यातील १०५ वर्षांची वाटचाल समर्थपणे करणारे असे शताब्दी साजरे केलेले राजाराम सीताराम दीक्षित वाचनालय हे शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने सतत नवनवीन उपक्रमांद्वारे त्यांच्यातील वाचन-साहित्याची संस्कृती जोपासण्यासाठी प्रयत्नशील आहे.

**St. Gabriel's High School Library :**

गोवा येथील आयोजित करण्यात आलेल्या डॉ. एस. आर. रंगनाथन् मेमोरियल नॅशनल सेमिनार मध्ये गोवा विद्यापीठाचे ग्रंथपाल डॉ. पी. व्ही. कोन्नुर व सहाय्यक ग्रंथपाल एम. मधूसुदन यांनी सादर केलेल्या अभ्यास-निबंधात Extension Programmes in School Libraries ह्या अभ्यासनिबंधात समाविष्ट केलेल्या सेंट गॅबरियल्स हायस्कूलच्या शालेय ग्रंथालयाचा निरिक्षणात्मक (आंध्र प्रदेशातील वारंगल येथे) अभ्यासाचा उल्लेख येथे उध्दृत करणे मला योग्य वाटते.

१९५५ साली स्थापन झालेल्या सेंट गॅबरियल्स हायस्कूलचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना जगातील ज्ञानाची माहिती करून देणे हा आहे. ह्या संस्थेत वर्गातील सर्व गोष्टींना, शिक्षणाला (शिकविण्यात येणाऱ्या विषयांना) जसे महत्त्व आहे तितकेच महत्त्व ह्या शाळेच्या ग्रंथालयाला सुद्धा आहे.

**या ग्रंथालयामार्फत विविध पुरक उपक्रम राबविले जातात. त्यातील काही उपक्रम पुढीलप्रमाणे :-**

१) **प्रश्नमंजुषा** - १९९३ पासून येथे प्रश्नमंजुषा आयोजित केली जाते. मुलांची शालेय अभ्यासक्रमात आवड टिकून राहावी त्यामुळे क्रमिक पाठ्यपुस्तकातील प्रश्न विचारले जातात. त्याचप्रमाणे ग्रंथालयांत उपलब्ध असणाऱ्या विविध शैक्षणिक साधने, नियतकालिके यांचा उपयोग करून विद्यार्थी स्वत:ची प्रश्नमंजुषेसाठी तयारी

---

**जो धर्म वा जो ईश्वर विधवांचे अश्रू पुसत नाही किंवा पोरक्या अनाथ बालकांच्या मुखात अन्नाचा घास घालीत नाही त्या धर्मावर वा त्या ईश्वरावर माझा विश्वास नाही.**

करतात. विजेत्यांना आकर्षक बक्षिसे दिली जातात. या अनुषंगाने ग्रंथालयाचा उपयोग करून राज्य, राष्ट्रीय स्तरावरील प्रश्नमंजुषेसाठी विद्यार्थी तयार होतात.

२) **निबंधस्पर्धा** - निबंध लिहिणे ही एक कला आहे. स्वत:चे विचार निबंधात प्रकट होत असतात. विद्यार्थ्यांना ह्या गोष्टीचा सराव व्हावा व त्यांना ह्यात प्रभुत्त्व प्राप्त व्हावे ह्या उद्देशाने ग्रंथालयामार्फत विविध विषयांवर निबंध स्पर्धा आयोजित केली जाते. विद्यार्थी आपले विषय तयार करण्यासाठी ग्रंथालयाचा जास्तीत जास्त उपयोग करतात.

३) **पुस्तके व नियतकालिकांचे प्रदर्शन** - विद्यार्थ्यांचे लक्ष केंद्रित करून घेण्यासाठी नवीन आलेली पुस्तके व नियतकालिके ग्रंथालयांत दर्शनी भागावर व्यवस्थितरित्या मांडली जातात. यामुळे विद्यार्थी आणि शिक्षक यांच्या वाचनाच्या कक्षा रुंदावतात.

४) **बुलेटीन बोर्ड** - ग्रंथालयाच्या उपक्रमांमध्ये बुलेटीन बोर्डला विशेष स्थान आहे. बुलेटिन बोर्डचा उपयोग करून ग्रंथपाल ज्ञानपूरक माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवू शकतो. ह्या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेमध्ये मिळविलेले यश हे देखील ठळकपणे बुलेटीन बोर्डवर लिहिले जाते. अशाप्रकारचे सहा बुलेटीन बोर्ड ह्या ग्रंथालयात लावलेले आहेत. त्याचा मुख्य उद्देश ग्रंथालयात जाता-येता विद्यार्थी त्याच्यावर नजर फिरवतील अशा प्रकारची मांडणी केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्याची आणि यशाची माहिती सर्वांना होऊन विद्यार्थ्यांमध्ये उत्साह वाढतो.

५) **वर्तमानपत्र कात्रण सेवा** - विविध वर्तमान-पत्रातील वेगवेगळ्या विषयांवरील कात्रणे खास करून बनविलेल्या शीटवर ड्रॉईंग लावली जातात आणि विषयानुसार विविध फाईल्समध्ये ती जतन करून ठेवली जातात. विशिष्ट प्रसंगाच्या वेळी ती बुलेटीन बोर्डवर प्रदर्शित करून विद्यार्थी व शिक्षकांचे लक्ष वेधले जाते.

अशा प्रकारे ही शाळा विद्यार्थ्यांसाठी सतत कार्य करण्यासाठी झटत असते.

त्याचप्रमाणे इतर संस्था सुद्धा विद्यार्थ्यांच्या विकासाच्या दृष्टीने, त्यांच्यात वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी प्रयत्न करीत आहेत.

फक्त कथा आणि कवितांचेच वाचन विद्यार्थी करीत नाहीत तर सध्याच्या काळात अत्यंत महत्त्वपूर्ण असणाऱ्या संगणक ह्या विषयाबद्दल, त्याच्या अभ्यासाबद्दल सुद्धा शालेय विद्यार्थी किती जागृत आहेत किंवहूना त्यांना त्याविषयी किती आवड आहे व त्यातून ते ह्याबद्दल आतापासूनच कशाप्रकारे विषय हाताळण्यासाठी प्रयत्न करीत आहेत ह्याचा प्रत्यय सुद्धा ह्या अभ्यासनिबंधाच्या मुळे मला आला. नुकतीच ह्या वर्षी नागपूरातील पांढरीपांडे कॉम्प्युटर सेंटर, धंतोली, नागपूर तर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी संगणक ज्ञान स्पर्धा आयोजित केली होती. ह्या परीक्षेला नागपूर बरोबरच इतर ग्रामीण भागातून सुद्धा उत्तम प्रतिसाद मिळाला होता. जवळ जवळ १००० मुलांचा ह्या परिक्षेला सहभाग होता. विद्यार्थीवर्ग या क्षेत्रात सुद्धा पुढे यावा यादृष्टीने अशा प्रकारच्या काही संस्था कार्यरत आहेत. हे एका खाजगी संस्थेतील उदाहरण झाले.

शालेय विद्यार्थ्यांकरिता प्रत्येक शाळेत काही संस्थांकडून घेण्यात येणाऱ्या स्पर्धा, परीक्षा यांचा अवलंब करण्यात येतो. ह्यात मुख्यत: टिळक विद्यापीठ, पुणे ह्यांच्यामार्फत आयोजित करण्यात येणारी गणित परीक्षा, राष्ट्रभाषा सभा, पुणे, वर्धा ह्यांची हिंदीची परीक्षा, नागपूरातील विदर्भ साहित्य संघाची मराठीची परीक्षा, ह्याबरोबर नागपूरात चालणारी टॅलेंट सर्च व नॅशनल स्तरावर चालणारी नॅशनल टॅलेंट सर्च ह्या सामान्य ज्ञानाच्या स्पर्धा इ. महत्त्वपूर्ण परीक्षा शालेय विद्यार्थ्यांच्या विकासाच्या दृष्टीने चालविण्यात येतात.

---

जर मी ईश्वर असेन तर माझा आत्मा हा सर्वश्रेष्ठ ईश्वराचे एक देऊळच म्हणावे लागेल.

त्याचबरोबर महाराष्ट्रातील नव्हे तर भारतात सुद्धा लोकप्रिय असलेल्या नागपूरातील अग्रगण्य दै. तरुण भारत व दै. हितवाद ही वर्तमानपत्रे सुद्धा ह्या शालेय विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारचे उपक्रम चालवितात. त्यात दै. तरुण भारतच्या 'स्पंदन' ह्या लोकप्रिय पुरवणीचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागले. त्यात मुलांना समजेल अशा शब्दांतील कथा, कवितांबरोबरच सध्याच्या आधुनिक काळातील दररोज घडणाऱ्या नवीन व रोचक माहितींचा समावेश असतो. तसेच ह्या वर्तमानपत्रातर्फे 'स्पंदन क्लब' सुद्धा चालविण्यात येतो. त्यातील शालेय सभासदांची संख्या जवळ जवळ बारा हजारांच्या आसपास आहे. तसेच दै. हितवाद ह्या इंग्रजी दैनिकाच्या माध्यमातून सुद्धा अमराठी विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अशा प्रकारचा क्लब व मासिक काढण्यात येते.

साहित्य प्रसार केंद्र हे बर्डीस्थित पुस्तकांचे दुकान सुद्धा शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनसाहित्याची आवड निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्यांच्यामार्फत दरवर्षी 'वाचनस्पर्धा' ह्या उपक्रमाअंतर्गत चांगली पुस्तके विद्यार्थ्यांना वाचायला देऊन त्या पुस्तकांमधून एखादा पॅरिग्राफ विद्यार्थ्यांकडून वाचून घेण्यात येतो.

येत्या ऑक्टोबर २००० पासून महाराष्ट्र शासनाने अभिनव क्रांतीकारी उपक्रम ह्या अंतर्गत दररोज एक नवीन विषय देऊन त्यावर शालेय विद्यार्थ्यांनी निबंधलेखन करावे असा उपक्रम हाती घेतला आहे.

अशाप्रकारे शालेय ग्रंथालयांबरोबरच सार्वजनिक, खाजगी संस्था, दुकाने व वृत्तपत्रे सुद्धा विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी व ती जोपासण्यासाठी सतत प्रयत्नशील आहेत आणि त्यामुळे ह्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाबरोबरच मानसिक व बौद्धिक विकासात सुद्धा ह्याचा महत्त्वाचा वाटा आहे.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडविण्यासाठी विविध क्षेत्रातील ज्ञानाचे दालन त्यांना उघडे करून द्यायला हवे. हे ज्ञान प्राप्त करण्याची प्रथम पायरी म्हणजेच त्यांच्यात वाचनसंस्कृती निर्माण करणे व जोपासणे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटल्याप्रमाणे 'वाचल तर वाचाल' ही संस्कृती निर्माण करणे ही आजची काळाची गरज आहे. वरील उल्लेखिलेल्या उपक्रमांच्या माध्यमातून वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी निश्चितच हातभार लागेल. ह्या विषयासंबंधी शालेय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने आवश्यक असणारे व उपयोगात येणाऱ्या विविध वाचनसाहित्य वाचण्याचा, त्या अनुषंगाने ते साहित्य हाताळण्याचा हा आगळा वेगळा अनुभव प्राप्त झाला. अशाप्रकारे शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड कशी निर्माण करावी व जोपासावी ह्या विषयावरील हा अभ्यासनिबंध सादर करतांना मला निश्चितच आनंद होत आहे.

**हा अभ्यासनिबंध सादर करतांना खालील ग्रंथांचा वापर केला :-**


१) **Library Public Relations** : Challanges of the New Millennium seminar papers of Dr. S. R. Ranganathan Memorial National Seminar, Goa University Library.

२) राजाराम सीताराम दीक्षित वाचनालयाची स्मरणिका - 'शतनिका'.

३) शालेय ग्रंथालयशास्त्र - प्रा. मोहन खडफळे

४) शैक्षणिक बालमानसशास्त्र - प्रा पठाण नसीम

५) विनभिंतीची उघडी शाळा - श्री. राजा मंगळवेढेकर

६) शिक्षणचित्र - प्रा. राम जोशी

७) दै. तरुण भारतचे काही अंक



**कु. मेधा हेमंत खरे**

२१/बी, ध्यानसिंग लॉजच्या बाजूला,

तोमर मार्ग, गिरिपेठ, नागपूर - १०.


***

# परिसर वार्ता

सौ. विशाखा देशपांडे

*'' नव्या शतकाचे गाणे गाऊ या हो सारे,*
*मनाच्या आभाळी, चमकती स्वप्न तारे ।*
*इच्छेचे मखर, त्यात श्रमाचे झुंबर,*
*प्रयत्नांचा ताल, त्याची लय हो सुंदर,*
*नव्या शतकाचे गाणे गाऊ या हो सारे ।''*

खऱ्या अर्थाने हे सहस्रक आता पूर्ण झालेले आहे. जुन्या मळलेल्या वाटा मागे टाकून पुढे येणाऱ्या भविष्याकडे आशादायी नजरेने बघताना येणाऱ्या शतकाचा कल्पनेत जरी आढावा घेतला तरी कल्पनेपलीकडच्या गोष्टी होताना दिसतात. प्रचंड वेगाने धावत असलेले विज्ञान जगत, माहिती तंत्रज्ञानामुळे कमी होत चाललेले पृथ्वीच्या कानाकोपऱ्यांतील अंतर, माणसाच्या माणुसकीवरील विश्वास किंवा अविश्वास आणि एकमेकांमधील नातेसंबंध, या सगळ्यांमधे घट्ट पाय रोवून, समर्थपणे उभे रहाण्याचा प्रयत्न करणारे आपण. 'जो समर्थपणे उभा राहतो तोच टिकतो,' हे लक्षात ठेवून प्रत्येकाने येणाऱ्या सहस्रकाचे, येणाऱ्या शतकाचे स्वागत केले पाहिजे !

नवीन वर्षाचे, नवीन शतकाचे व नवीन सहस्रकाचे स्वागत करून, सर्वांना शुभेच्छा व्यक्त करून ही परिसर वार्ता सादर -

**सौ. आंनदीबाई केशव जोशी इं. मि. स्कूल - (पूर्व प्राथमिक) :**

कुमार कला केंद्र, मुंबई तर्फे घेण्यात येणाऱ्या विविध गुणदर्शन स्पर्धेमध्ये खालील मुलांनी पारितोषिके पटकावली:-

| | | |
|---|---|---|
| **वक्तृत्व स्पर्धा -** | ओजस गुजरे | -प्रथम क्रमांक |
| | हर्षाली भोसले | -प्रथम क्रमांक |
| **गीत गायन स्पर्धा -** | प्रज्ञा प्रसादे | -प्रथम क्रमांक |
| | रुपाली पिसाट | -प्रथम क्रमांक |
| **विविध वेशभूषा -** | प्रज्ञा प्रसादे | -प्रथम क्रमांक |
| | हेतवी मोटा | -द्वितीय क्रमांक |
| | इशा पटवारी | - द्वितीय क्रमांक |

श्री कल्याण केन्द्र, ठाणे तर्फे घेण्यात आलेल्या 'सभिनय गोष्ट' या स्पर्धेमध्ये पुढील विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली :-

प्रज्ञा प्रसादे , अद्वैत पंडित, इशा पटवारी, शामिका गोगटे, ओजस गुजरे.

'रोटरॅक्ट क्लब' ठाणे यांनी आयोजित केलेल्या 'कलाकार २०००' या विविध वेशभूषा स्पर्धेमध्ये - प्रज्ञा प्रसादे , ओजस गुजरे, इशा पटवारी यांना पारितोषिके मिळाली.

'दिशा' तर्फे या सर्वांचे अभिनंदन !

दि. १७ डिसेंबर रोजी पूर्व-प्राथमिक विभागाचे वार्षिक स्नेहसंम्मेलन व पारितोषिक वितरण समारंभ पार पडला. अध्यक्ष स्थानी मंडळाचे उपाध्यक्ष श्री. वि. करंदीकर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ठाण्यातील नामवंत बालरोग तज्ज्ञ डॉ. श्री. सुहास कुलकर्णी उपस्थित होते. या प्रसंगी छोटा शिशु व मोठा शिशुतील सर्वोत्तम विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. वक्तृत्व, चित्रकला या मध्ये सर्वोत्तम असलेल्या विद्यार्थ्यांना पुरस्कृत पारितोषिके देण्यात आली. या प्रसंगी बोलताना डॉ. सुहास कुलकर्णी यांनी सांगितले की, इतक्या लहान वयात मुलांची मने फार संवेदनशील असतात आणि त्याच वयात त्यांची मने जपण्याची व त्यांना योग्य आकार देऊन घडविण्याचे काम

शिक्षिका करीत असतात. तेव्हा त्यांचे योगदान या क्षेत्रात निश्चित अत्यंत मोलाचे आहे. ते पुढे असे ही म्हणाले की, 'प्रथम मी विचार करीत होतो की शिशु वर्गाच्या स्नेहसंम्मेलनासाठी मला का आमंत्रित केले गेले. परंतु जेव्हा मला माझे छोटे पेशंट अभिमानाने सांगू लागले की ''डॉक्टर मला तुमच्या हातून बक्षिस मिळणार आहे तेव्हा मला, माझं, त्यांच्या मनातील असलेलं स्थान काय आहे ते समजलं. आणि मी इथे येऊन सर्व कार्यक्रम बघण्याचे निश्चित केले.'' या वेळी विद्यार्थ्यांनी सुरेख करमणुकीचे कार्यक्रम सादर केले.

**सौ. आंनदीबाई केशव जोशी इं. मि. स्कूल - माध्यमिक प्राथमिक :**

कुमार कला केंद्र, मुंबई तर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता ६ वी आंतर शालेय नाट्य महोत्सवामध्ये सादर करण्यात आलेल्या 'अनमोल नजराणा' या विशाखा देशपांडे लिखित एकांकिकेला ठाणे विभागामध्ये प्रथम पारितोषिक मिळाले. सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषिक सौ. शिल्पा भांगले यांना मिळाले व सर्वोत्कृष्ट अभिनयाचे पारितोषिक आकृती माहीमकर हिला मिळाले. या एकांकिकेच्या निर्मिती मध्ये श्री. संजय बोरकर, सौ. वीणा जोशी व सौ. अर्पणा भोळे यांचे विशेष मार्गदर्शन व सहाय्य लाभले.

''दिशा'' तर्फे सर्वांचे हार्दिक अभिनंदन !

**डॉ. बेडेकर विद्या मंदिर -माध्यमिक विभाग :**

डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.) चे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ दि. २१ व २२ डिसेंबर २००० या दोन दिवशी आयोजित करण्यात आला होता.

दि. २१ डिसेंबर २००० या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. मनोज प्रधान (नगरसेवक) हे उपस्थित होते. त्यांनीही आपल्या भाषणात शाळेतील शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. पुढे ते म्हणाले की संस्कृती, प्रकृती व विकृती या समजून घ्या. भुकेलेल्याला अन्न देणे ही संस्कृती, भूक लागल्यावर खाणे हे प्रकृती व दुसऱ्याच्या पुढ्यातील अन्न ओढून घेणे ही विकृती. तेव्हा यातले काय घ्यायचे ते ठरवा. एक मोलाचा संदेश देताना ते म्हणाले- आयुष्यात महत्त्वाकांक्षी बना. ध्येय ठेवा व त्या दिशेने वाटचाल करा. जिद्द, मेहनत, चिकाटी यांचा संगम म्हणजे सुयश. तुमच्यामध्ये या तिन्हींचा संगम असू द्या. व यशस्वी व्हा.

त्यांच्या हस्ते इयत्ता ५ वी ते ९ वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान वि. प्र. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी भूषविले. या कार्यक्रमास विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी, कार्याध्यक्ष श्री. अ. भो. टिळू, उपाध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर, सभासद श्री. दि. गु. जोशी, श्री. ल. ग. देव व श्री. वि. ना. मराठे उपस्थित होते.

दिनांक २२ डिसेंबर २००० रोजी प्रमुख पाहुणे म्हणून ठाण्यातील सुप्रसिद्ध नाक, कान, घसा तज्ज्ञ डॉ.अशिष भूमकर हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान वि. प्र. मंडळाचे अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी भूषविले.

ईशस्तवन स्वागत गीताने कार्यक्रमास सुरुवात झाली. त्यानंतर मुख्याध्यापिका सौ. सविता केळकर यांनी प्रास्ताविक केले. उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. शाळेतून दरवर्षी 'आदर्श विद्यार्थी' निवडला जातो. त्याची अभ्यासातील प्रगती, इतर क्षेत्रातील प्रगती, एकूण व्यक्तिमत्त्व या निकषावर ही निवड करण्यात येते. यावर्षीचा आदर्श विद्यार्थी म्हणून कु. आश्लेषा सुरेंद्र वेरेकर (९अ) हिची निवड करण्यात आली. आपले मनोगत व्यक्त करताना ती म्हणाली, मी या शाळेत छोटा शिशुपासून आहे. या शाळेनेच माझे व्यक्तिमत्त्व घडवले. शिक्षकांनी माझ्यातले

गुण पाहून प्रोत्साहन दिले त्याचमुळे मी या पारितोषिकाची मानकरी ठरले.

प्रमुख पाहुणे डॉ. अशिष भूमकर यांनी सर्वप्रथम सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांना वाव देऊन त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्यात शाळेतील शिक्षकांचा मोठा सहभाग आहे असे ते म्हणाले. मुलांचे कौतुक करताना शाळेतील क्रीडापटू कु. प्रचिता पाटणकर हिच्या हाताच्या प्लॅस्टरवर त्यांनी लवकरच बरी हो अशा शुभेच्छाही दिल्या. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे त्यांनी दिलेला संदेश 'तुमची खरी ओळख ही तुमच्या कामात आहे. त्यासाठी तुमची वैयक्तिक ओळख (Bio-data) वाढविण्याची गरज नाही.

आपल्या आयुष्यात मार्कांचा सहभाग थोडाच असतो. केलेल्या अभ्यासाचे किती आकलन झाले याला महत्व आहे. नियमित आखून अभ्यास केलात तर यश तुमचेच आहे. आपण पुढे जाताना दुसऱ्याला मागे खेचू नका सगळ्यांना बरोबर घेऊन पुढे जा. आपल्यातील गुण ओळखून ते वृद्धिंगत करा. अभ्यासाबरोबरच इतर क्षेत्रातही प्रगती करा. पुस्तकातील किडा बनून रेसचा घोडा होऊ नका.''

अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी शाळेतील विद्यार्थ्यांबरोबरच त्यांना घडवणाऱ्या सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले. अभ्यास करण्यासाठी शरीर व मन तंदुरस्त हवे त्यासाठी खेळ हवा, व्यायाम हवा हे सांगताना दूरदर्शनसमोर तासन्तास बसू नका. जे पहाल ते चांगलेच पहा असा मोलाचा संदेश दिला.

दोन्ही दिवशी रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रम झाले.

✰ होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेत इ.६वी तील १३ विद्यार्थ्यांची प्रयोग परीक्षेसाठी निवड झाली व १७ जणांना प्रमाणपत्रे प्राप्त झाली. इ. ९वी तील ७ विद्यार्थ्यांची प्रयोग परीक्षेसाठी निवड झाली व ९ जणांना प्रमाणपत्रे प्राप्त झाली. सुयोग संजीव मपारा (९अ) हा जिल्ह्यात ४थ्या क्रमांकावर चमकला. मार्गदर्शक शिक्षिका सौ. उज्वला धोत्रे, सौ. नेत्रा सोनवणे (इ. ६वी साठी), उपमुख्याध्यापिका सौ. चौवळ, सौ. गाडगीळ, सौ. पंडित (इ. ९वी साठी) यांनी विशेष मेहनत घेतली.

✰ आंतरराष्टीय गणित वर्षानिमित्त गणित अध्यापक मंडळाने आयोजित केलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत आपल्या शाळेतील प्रणव पेंडसे (१०अ) व अमेय जोशी (९अ) यांची जिल्हापातळी साठी निवड झाली. त्यांना सौ. भट यांनी मार्गदर्शन केले.

✰ नेहरू सायन्स सेंटर येथे होणाऱ्या प्रश्नमंजुषा कार्यक्रमात उर्मिला शिंदे, प्रणव पेंडसे, भूषण वर्वे व हर्षदा म्हात्रे सहभागी होणार आहेत. त्यांना पंडित यांनी मार्गदर्शन केले आहे.

✰ १३ ते १५ डिसेंबर २००० या कालावधीत भाईंदर येथे तालुकास्तरीय विज्ञान स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यासाठी आपल्या शाळेने 'सांडपाण्यातून उर्जा निर्मिती' हा प्रकल्प निवडला होता. त्यासाठी श्री. कापसे व श्री. देवधर यांनी मार्गदर्शन केले.

✰ रानडे वक्तृत्व स्पर्धा पुणे येथे घेण्यात येतात. यावर्षी रोहन शास्त्री (८ब) याने शाळेचे प्रतिनिधित्व केले. त्याने नेमून दिलेल्या विषयासह इतर २६ विषयांचीही (उत्स्फूर्त) तयारी केली होती. यासाठी त्याला सौ. कळमकर यांनी मार्गदर्शन केले.

✰ स्नेहसंमेलना निमित्त विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्याची पारितोषिके दि. २३ रोजी प्रदान करण्यात आली.

•••